सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३०० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## थोडक्यात...

### दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात भारतीय लष्कराकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत 'जैश-ए-मोहम्मद'च्या टॉप कमांडरसह दोन पाकिस्तानी दहशदवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू आणि काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यातील एका गुहेत अडकलेल्या जैश-ए-मोहम्मद संघटनेच्या एका वरिष्ठ कमांडरसह दोन पाकिस्तानी दहशदवाद्यांचा बुधवारी खात्मा करण्यात आला. दुपारी १२ वाजता सैन्याने गुहेत घुसखोरी केली तेव्हा अनेक मोठे स्फोट ऐकू आले.अधिकाऱ्यांनी पुढे सांगितले की, मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांपैकी एक रुबानी उर्फ अबू माविया होता, जो जैश-ए-मोहम्मद संघटनेचा एक टॉप कमांडर होता आणि गेल्या अनेक वर्षांपासून या भागात सक्रिय होता.

### ६२२ ग्रामपंचायतींमध्ये 'प्रशासक राज'

**नाशिक :** यंदा मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील ६२२ ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यात येणार आहे. सार्वत्रिक निवडणूका होऊन नवी कार्यकारिणी अस्तित्वात येईपर्यंत प्रशासकांच्या हाती गावाच्या चाव्या असतील. त्यामुळे विकासकामांवर मर्यादा येण्याची शक्यता आहे.

आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांहून अधिक असल्याने जिल्हा परिषद आणि पंधराही पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्याची अर्थवाहिनी असलेल्या जिल्हा परिषदेचा कारभार सध्या प्रशासकाच्या हाती आहे. त्यातच आता जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपुष्टात येणार असल्याने तेथेही प्रशासक नेमण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

### उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर

**मुंबई :** मुंबईमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी गोरेगाव-मुलुंड लिंक रोड हा खूप महत्त्वाचा ठरणार आहे. या मार्गावरील काम प्रगतीपथावर सुरू असून अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर हे या प्रकल्पाची पाहणी करत आहेत. यावेळी मुंबई महापालिकेने या प्रकल्पाबद्दल माहिती आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून दिली.

गोरेगाव मुलुंड लिंक रोड अंतर्गत मुलुंड (पश्र्चिम) खिंडपाडा येथील गुरु गोविंद सिंग मार्गावर उन्नत चक्रीय मार्ग बांधण्याचं काम सुरु आहे. शिवाय मुलुंडमधील डॉ. हेडगेवार चौकात केबल स्टेड उड्डापुलाच्या संरचनेचं काम सुरू आहे. या उड्डाणपुलाचं काम प्रगतीपथावर सुरू असल्याची माहिती अभिजीत बांगर यांना यावेळी दिली.

### मुंबई न सोडण्याचे आदेश


**मुंबई :** मुंबईच्या महापौरपदाची निवडणूक ११ फेब्रुवारीला होणार असल्याच्या पार्श्र्वभूमीवर नगरसेवकांनी मुंबई सोडून जाऊ नये, असे आदेश भाजप आणि शिव-सेना (उबाठा) पक्षातर्फे जारी करण्यात आले आहे.मुंबईच्या महापौरपदी कोणाची नियुक्ती होणार, याचे चित्र अद्याप अस्पष्ट आहे. त्यासाठी भाजप-शिवसेना महायुतीत खलबते सुरू आहेत. स्थायी, सुधारसह अन्य महत्त्वाच्या समित्यांचे वाटपही निश्र्चित झालेले नाही. त्यातच ११ फेब्रुवारी रोजी महापौरपदाची निवडणूक होणार आहे. त्यासाठी ७ फेब्रुवारी नामनिर्देशन अर्ज दाखल करावा लागणार आहे.

### उबाठाचेही राहणार उमेदवार

**मुंबई :** मुंबई महापौर निवडणूक येत्या ११ फेब्रुवारीला मुंबई महापालिका मुख्यालयात होणार आहे. शिव-सेना उबाठा पक्षानेही महापौर-उपमहापौर निवडणुकीसाठी उमेदवार देण्याची तयारी सुरू केली आहे. सात फेब्रुवारीला या निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज सादर करण्यासाठी शिवसेना उबाठाचेही महापौर-उपमहापौर उमेदवार येणार असून, त्यांच्यासोबत सर्व नगरसेवकही उपस्थित राहणार आहेत. तसे पक्षाकडून आदेशही देण्यात आले आहेत. मात्र उबाठा पक्षाकडून महापौर-उपमहापौर उमेदवार अर्ज कोण सादर करणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मुंबई महापालिकेत भाजपचे ८९, शिव-सेना उबाठाचे ६५, शिवसेना (शिंदे गट) २९ नगरसेवक आणि मनसे, एमआयएम, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, समाजवादी पक्षा-चेही नगरसेवक निवडून आले आहेत.

# काँग्रेसकडे ना कोणता विचार, ना कोणती दूरदृष्टी..

## राज्यसभेत पंतप्रधान मोदींकडून सडकून टीका



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यसभेत आभार प्रस्ताव-ावरील चर्चेला उत्तर देत आहेत. पंतप्रधानांच्या भाषणादरम्यान विरोधकांनी सभात्याग केला. विरोधकांच्या अनुपस्थितीतही पंतप्रधानांचे भाषण सुरू राहिले. त्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला, कारण त्यांच्याकडे इच्छाशक्ती किंवा दूरदृष्टी नाही. तत्पूर्वी, राज्यसभेत सभागृह नेते जेपी नड्डा आणि विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. राज्यसभेचे कामकाज सुरू होताच, खरगे यांनी लोकसभेत मागील घटनेचा मुद्दा उपस्थित केला आणि म्हटले की, विरोधी पक्षनेत्याला तिथे बोलू दिले जात नाही. नड्डा यांनी त्यांना अडवले आणि सांगितले की, ते येथे दुसऱ्या सभागृहाच्या बाबींवर चर्चा करू शकत नाहीत.**

लोकसभेत कामकाज सुरू होताच, गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करावे लागले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, विरोधी पक्ष सदस्यांनी पुन्हा वेलमध्ये गर्दी केली. गोंधळादरम्यान, सभापती ओम बिर्ला यांनी आभार प्रस्ताव मतदानासाठी ठेवला आणि तो आवाजी मतदानाने मंजूर झाला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, मी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आलो आहे. पंतप्रधान मोदी बोलल्यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ घातला. त्यांनी तंटामुक्ती चालणार नाही अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, देश आज वेगाने विकास करत आहे. आपण थांबू नये किंवा मागे वळून पाहू नये. आपण एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचत आहोत. जेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देश जगात सहाव्या क्रमांकावर होता, परंतु या लोकांनी (काँग्रेसने) तो दहाव्या क्रमांकावर नेला आहे.

**विरोधकांनी सभागृहातून वॉकआउट केले**

पंतप्रधान मोदींच्या भाषणादरम्यान, विरोधकांनी घोषणाबाजी केली आणि सभागृहातून वॉकआउट केले. पंतप्रधान मोदी म्हणाले, जे निराश होऊन निघून गेले आहेत त्यांना उत्तर द्यावे लागेल. काँग्रेसमुळे देशाला त्रास होत आहे. काँग्रेसकडे दूरदृष्टी नाही आणि इच्छाशक्ती नाही. स्वतःला राजा मानणारे देखील आर्थिक समानतेबद्दल बोलतात. हेच दिवस आपल्याला पाहायचे राहिले आहेत का? पंतप्रधान मोदींनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणाचे कौतुक केले आणि म्हटले की त्यांनी समाजाच्या प्रत्येक घटकाच्या चिंता दूर केल्या.

### भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था - पंतप्रधान मोदी

पंतप्रधान मोदी म्हणाले की जग एका नवीन जागतिक व्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. आपण एका अतिशय महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचलो आहोत. जग आपले महत्त्व ओळखत आहे. भारताने नऊ प्रमुख देशांशी व्यापार करार केले आहेत. भारत हा अनेक देशांचा विश्र्वासू भागीदार आहे आणि जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे. जग आपल्या प्रतिभेचे महत्त्व ओळखत आहे. भारत आपली क्षमता दाखवत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारतावर भाषण देताना म्हटले की, देश धोरणांच्या आधारे पुढे जात आहे. आज, देश सुधारणा एक्सप्रेसमध्ये स्वार होत आहे. भारत जगाशी स्पर्धा करण्यास तयार आहे. प्रमुख देश भारतासोबत व्यापार करण्यास उत्सुक आहेत. आम्ही युरोपियन युनियन सोबत सर्व करारांची जननी म्हणून स्वाक्षरी केली आहे. आज, देश धोरणांच्या आधारे पुढे जात आहे.

## नवी मुंबईत भाजपची सरशी !

**तभा वृत्तसेवा**

**नवी मुंबई,दि. ०५ फेब्रुवारी:** नवी मुंबई महापालिकेच्या महापौरपदाबाबत निर्माण झालेला सस्पेन्स अखेर संपला असून ही दोन्ही पदे आपल्याकडे खेचण्यात भाजप ला यश आलं आहे. निवडणुकीत बहुमत मिळवलेल्या भाजपने महापौर, उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केले होते. तर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने संख्याबळ कमी असतानाही दोन्ही पदांवर दावा करत अर्ज भरले होते. यातून एकनाथ शिंदे यांच्याकडून वनमंत्री आणि भाजप नेते गणेश नाईक यांना आव्हान देण्यात आल्याची चर्चा होती. मात्र आज झालेल्या महापौर निवडणुकीवेळी शिंदेंच्या शिवसेनेनं दोन्ही अर्ज मागे घेतल्याने अखेर ही निवडणूक बिनविरोध झाली आणि भाजपच्या सुजाता पाटील या महापौरपदी तर उपमहापौरपदी दशरथ भगत यांची निवड झाली आहे.

## जमीन घोटाळ्याप्रकरणी 'पार्थ' ना तूर्तास क्लीनचिट नाही !

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०५ फेब्रुवारी :** राजकीय वर्तुळात काही महिन्यांपूर्वी खळबळ उडवून देणाऱ्या पार्थ पवार यांच्याशी संबंधित कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी सस्पेन्स आता अधिकच वाढला आहे. कारण पार्थ पवार यांना या प्रकरणात क्लीन चिट मिळाल्याची चर्चा असताना या प्रकरणाचा कोणताही अधिकृत अहवाल अद्याप सरकारकडे प्राप्त झालेला नाही, असं सांगत भाजप नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे पार्थ पवार यांना तूर्तास कोणतीही 'क्लीन चिट' मिळालेली नसून, चौकशीचा फेरा आता पुढील आठवड्यापर्यंत लांबणीवर पडला आहे.



भाजप नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले, पार्थ पवार यांच्याशी संबंधित असलेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या खारगे समितीने सरकारकडे ७ दिवसांची अधिक वेळ मागितली होती. ही मागणी मान्य करण्यात आली असून, आता पुढील ८ दिवसांच्या आत अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अहवाल माझ्याकडे आल्याशिवाय यावर भाष्य करणे उचित ठरणार नाही, असे बावनकुळे यांनी नमूद केले. चौकशी समितीला मिळालेल्या या मुदतवाढीमुळे तपासात काही नवीन धागेदोरे हाती लागले आहेत का, अशा चर्चांना आता उधाण आले आहे.

दुसरीकडे, या प्रकरणावरून महायुतीमध्ये सावधगिरीचे वातावरण पाहायला मिळत आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, अजित पवार यांच्या पक्षाबद्दल किंवा त्यांच्या नेत्यांबद्दल कोणतेही चुकीचे विधान करू नका. एकीकडे पार्थ पवारांची चौकशी सुरू असताना दुसरीकडे महायुतीचा धर्म पाळण्यासाठी भाजप नेत्यांकडून होणारी ही 'डॅमेज कंट्रोल'ची कसरत राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. आता ८ दिवसांनंतर येणाऱ्या अहवालात काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## लाडक्या बहिणींच्या सुरक्षेसाठी महायुती सरकारकडून विशेष खबरदारी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ५ फेब्रुवारी :** महिलांवरील हिंसाचार, अत्याचार किंवा आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ आणि सर्वांगीण मदत मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'वन स्टॉप सेंटर्स'साठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे केंद्रांच्या दैनंदिन कामकाजासाठी निधीची अडचण दूर होणार असून सेवा अधिक सुरळीतपणे राबवता येणार आहेत.

केंद्र सरकारच्या 'मिशन शक्ती' योजनेतील 'संबल' उपयोजनेअंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या वन स्टॉप सेंटर्ससाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. २०२६च्या अर्थसंकल्पाच्या आधीच बुधवारी या निर्णयाला मंजुरी देण्यात आली. वन स्टॉप सेंटर्समध्ये संकटग्रस्त महिलांसाठी एकाच ठिकाणी मानसिक समुपदेशन, वैद्यकीय मदत,




पोलिसांची मदत, तात्पुरते निवासस्थान तसेच कायदेशीर सल्ला व मदत या सुविधा दिल्या जातात. त्यामुळे पीडित महिलांना वेगवेगळ्या कार्यालयांत वारंवार जाण्याची गरज राहत नाही.

आतापर्यंत या केंद्रांसाठी एकच अर्थसंकल्पीय तरतूद वापरली जात होती, जी मुख्यत्वे इमारती व पायाभूत सुविधांसारख्या खर्चापुरती मर्यादित होती. कर्मचारी वेतन, वीज-पाणी बिले आणि रोजचा प्रशासकीय खर्च यासाठी निधी वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे निर्दशनास आले होते. त्यामुळे दैनंदिन कामकाजासाठी स्वतंत्र 'बजेट हेड' असावा, निधी अडथळ्याशिवाय मिळावा आणि सेवा खंडित होऊ नयेत, यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ही योजना सामाजिक सुरक्षा व कल्याण या वर्गवारीखाली येत असून, यासाठीचा १०० टक्के खर्च केंद्र सरकारकडून दिला जाणार आहे. महिला व बालविकास आयुक्त (पुणे) यांच्याकडे खर्चावर नियंत्रणाची जबाबदारी राहणार असून, आयुक्तालयातील लेखाधिकारी 'ड्रॉइंग अँड डिस्बर्सिंग ऑफिसर' म्हणून काम पाहणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील वन स्टॉप सेंटर्स अधिक सक्षमपणे कार्यरत राहतील आणि संकटात सापडलेल्या महिलांना आवश्यक सेवा वेळेवर मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संसदेत मोदींवर हल्ला करण्याचा कट होता, भाजपचा विरोधकांवर गंभीर आरोप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भाषण करता आलं नाही. त्यावरुन आता राजकीय रणकंदन माजलं आहे. या सगळ्या घटनाक्रमावरुन भाजप खासदार मनोज तिवारी आणि कंगना रणौत यांनी विरोधकांवर गंभीर आरोप केले आहेत. मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देणार होते. तेव्हा काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभेत पंतप्रधानांचा रस्ता पूर्णपणे रोखला. विरोधी पक्षाच्या खासदारांनी लोकसभेच्या अध्यक्षांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यांना पंतप्रधानांवरही हल्ला करायचा होता, असा सनसनाटी आरोप हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघाच्या खासदार कंगना रणौत यांनी केला.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार मंगळवारी स्वीकारणार पदभार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ५ फेब्रुवारी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेल्या सुनेत्रा पवार मंगळवारी, १० फेब्रुवारी रोजी औपचारिकरित्या पदभार स्वीकारणार आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर त्याच दिवशी त्या मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित राहणार असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्यालयालाही भेट देणार आहेत.

सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, तसेच अल्पसंख्याक आणि औकाफ या मंत्रालयांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. १० फेब्रुवारी रोजी सकाळी



मंत्रालयात पदभार स्वीकारल्यानंतर दुपारी १२ वाजता होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीला त्या उपस्थित राहतील. अजित पवार यांच्या निधनामुळे या आठवड्यातील मंत्रिमंडळ बैठक रद्द करण्यात आली होती.

दरम्यान, दिवंगत अजित पवार यांच्याकडे असलेले पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पददेखील सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आले आहे. तसेच अजित पवार यांच्या वापरातील मंत्रालयातील दालने आणि शासकीय निवासस्थान सुनेत्रा पवार यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पदभार स्वीकारण्याच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह सर्व मंत्री आणि आमदार उपस्थित राहणार आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर सुनेत्रा पवार मंत्रालयानजीकच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्यालयातही हजेरी लावणार आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर त्या पहिला निर्णय कोणता घेणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### सुनेत्रा पवारांना 'झेड' प्लस सुरक्षा

महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना 'झेड प्लस' दर्जाची सुरक्षा मिळणार आहे. याविषयीचा निर्णय राज्य सरकारने बुधवारी घेतला. याआधी खासदार असताना पवार यांना 'एक्स' दर्जाची सुरक्षा होती. मात्र, उपमुख्यमंत्रिपदी शपथ घेतल्यानंतर पवार यांच्या सुरक्षेची विशेष खबरदारी राज्य सरकारकडून घेण्यात येत आहे.

सुनेत्रा पवार यांच्याकडे तीन खातीही सोपविण्यात आली असून, मंत्रालयात अजित पवार यांच्या वापरातील दालनेही त्यांच्या कार्यालयासाठी मंगळवारी प्रदान करण्यात आली. पुणे आणि बीड हे राज्याच्या राजकारणातील महत्त्वाच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रिपदही त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यानंतर सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षेचा आढावा राज्य सरकारकडून घेण्यात आला असून, त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सीटीईटी परीक्षेसाठी शिक्षकांना सुटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ५ फेब्रुवारी :** केंद्रीय शिक्षकपात्रता परीक्षेसाठी (सीटीईटी) शिक्षकांना सूट दिल्याने दिलासा मिळाला असून, ही सीटीईटी परीक्षा दोन सत्रात होणार आहे. ही सीटीईटी परीक्षा केंद्राची असल्याने त्यात कोणताही बदल होणार नाही. हे प्रशासनाला माहिती असल्याने ज्या शिक्षकांनी सीटीईटी परीक्षेचे अर्ज भरले त्यांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेतून सुटी देण्यात आली आहे .

राज्य मतदान प्रक्रियेस नियुक्त शिक्षकांच्या जागी सरकारच्या ३०० कर्मचाऱ्यांची सोमवारी अचानक नियुक्तीपत्र देऊन नेमणूक केली. त्यामुळे सीटीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला. अन्यथा या शिक्षकांना सुटी दिली नसती तर त्यांना सीटीईटी परीक्षेस मुकावे लागले असते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झाल्याने राज्यात तीन दिवस दुखवटा पाळण्यात आला. पर्यायाने, मंत्री, आमदार, खासदारांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रचार करता आला नाही. म्हणून ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान पुढे ७ फेब्रुवारीला ढकलण्यात आले. ७ फेब्रुवारीलाच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचे मतदान आल्याने शिक्षकांची अडचण झाली.

शेवटी शिक्षकांना परीक्षेस सूट देणे आवश्यक होते. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शिक्षकांना सीटीईटी परीक्षेस सूट देत त्यांची मतदान प्रक्रियेतून सुटी केली.



## विविध वृत्त...

### राजम्याची बाजारात आवक वाढली

**लातूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी व शनिवारी राजम्याची मोठी आवक झाल्याचे दिसून आले. शुक्रवारी राजम्याचा कमाल दर ८ हजार ७५१ तर सर्वसाधारण दर ८ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल एवढा होता. शनिवारी त्यात घसरण झाल्याचे दिसून आले, शनिवारी कमाल दर ८ हजार ७०० तर सर्वसाधारण दर ८ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल एवढा होता. शुक्रवारच्या तुलनेत शनिवारी आवक कमी झाली तरी दरही घसरल्याचे दिसून आले. शुक्रवारी ४२० क्विंटल तर शनिवारी ३२१ क्विंटल एवढी आवक झाली. यंदा जिल्ह्यात हरभरा पिकाबरोबरच राजमा पिकाची लागवड केली आहे. राजम्याला उतारा आणि बाजारभावही जास्त असल्याने राजम्याकडे ओढा असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

### भुयारी मार्गात वाढली अस्वच्छता

**लातूर :** शहरातील भुयारी मार्गात रस्त्याच्या दोन्ही बाजूला धूळ व कचरा साचला आहे. तसेच मार्गात पाणी साचल्याने वाहनधारकांची गैरसोय होत आहे. शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या या भुयारी मार्गाच्या साफसफा-ईकडे पालिकेचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. भुयारी मार्गात योग्य निचरा व्यवस्था नसल्याने येथे अधूनमधून पाणी साचते. त्यामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यता आहे. महापालिका प्रशासनाने भुयारी मार्गात स्वच्छता करावी, अशी मागणी होत आहे.

### जिल्हा परिषद निवडणुकीमुळे कार्यालयांत शुकशुकाट

**जळकोट :** जळकोट तालुक्यात सध्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची तयारी सुरू आहे. या निवडणुकांमुळे जळकोट शहरात असलेल्या सर्व सरकारी कार्यालयामध्ये शुकशुकाट दिसून येत आहे. जळकोट तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ लागत आहे. शहरातील सर्व कार्यालयातील कर्मचाऱ्यांना इलेक्शन ड्युटी लागलेली आहे. जळकोट शहरात असलेल्या नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बाल विकास प्रकल्पाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग कार्यालय, तहसील कार्यालय, आदी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती या जिल्हा परिषदेचे पंचायत समिती निवडणुकीसाठी करण्यात आलेले आहे.

### चला भारताला निरोगी बनवूया या विषयावर एक दिवसीय सेमिनार

**लातूर :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे चला भारताला निरोगी बनवूया या मिशन अंतर्गत प्रोजेक्टच्या माध्यमातून एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.या सेमिनारच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून निसर्ग उपचार संस्था,पुणे येथील सिद्धांत तावरे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे,पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, सेमिनार समन्वयक व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे,प्रा.मेघा पंडित,प्रा.शिवाजी आळणे, डॉ.रवींद्र शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**लातूर :** रोटरी क्लब लातूर व दयानंद शिक्षण संस्था, संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोबाईल संस्कृती प्रगती की अधोगती या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते. कोव्हिड कालावधीपासून सबंध विद्यार्थी मोबाईलच्या आहारी गेलेले आहेत यामुळे त्यांच्या शरीर व मनावर सखोल परिणाम होत चाललेला आहे. याचे गांभीर्य विचारात घेऊन हा विषय ठेवण्यात आलेला होता. सबंध जिल्हाभरातून ६१ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी नाव नोंदणी केलेली होती. अनेकांनी या विषयाच्या अनुकूल बाजूने आपली मते मांडली त्यात मोबाईल हा आपल्या मूलभूत गरजा पैकी एक गरज आजच्या आधुनिक काळात निर्माण होत चाललेला आहे त्याचा योग्य मार्गाने, विधायक कामासाठी वापर केला तर ज्ञानवृद्धी होऊ शकते.काहींनी या विषयाच्या प्रतिकूल बाजूने आपली मते मांडली. काहींच्या मतानुसार मोबाईल हा विध्वंसाचे कारण बनत चाललेला आहे यापासून अनेकांना शारीरिक व्यंगत्व प्राप्त होत चालले आहे.

### देशमुख महाविद्यालयात सुशीलोत्सव समारंभ उत्साहात

**लातूर :** येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात सुशीलोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या समारंभासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकप्रिय कवी रामदास कांबळे यांची विशेष उपस्थिती होती.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय पाटील हे होते. विचार मंचावर या समारंभाचे समन्वयक प्रा. दादासाहेब लोंढे, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. शंकर चव्हाण, विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. हरिश्चंद्र मोगरगे याबरोबरच या समारंभाचे उद्घाटक प्रा. जयंत शास्त्री आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रास्ताविक विचार प्रा. शंकर चव्हाण यांनी केले . विद्यार्थ्यांचे कौशल्य, स्किल विकसित होण्यासाठी म्हणून या समारंभाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# सोमवारी होणार लातूरच्या कारभाऱ्यांची निवड

## महापौरपदी जयश्री सोनकांबळे तर उपमहापौरपदी ॲड. स्नेहल उटगेंची निवड निश्चित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी : नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. लातूरच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड सोमवारी, दि. ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. गुरुवारी महापौर - उपमहापौर पदासाठी काँग्रेसकडून अनुक्रमे जयश्री भालचंद्र सोनकांबळे व ॲड. स्नेहल श्रीकांत उटगे यांनी आपली नामनिर्देशनपत्रे दाखल केली. पालिकेत या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीची केवळ औपचारिकता बाकी आहे. काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनीही या पदासाठी उमेदवारी दाखल केल्याने ही निवडणूक बिनविरोध होऊ शकली नाही.**

लातूर शहर महानगरपालिकेच्या एकूण ७० जागांसाठी पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ४७ , भारतीय जनता पार्टीने २२ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने १ जागा जिंकली आहे. काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचित बहुजन आघाडीने आपला आघाडी धर्म न पाळता काँग्रेसच्या उमेदवारांसमोर निवडून येणार नाही, हे माहिती असतानाही आपले उमेदवार देऊन काँग्रेससोबतची आपली आघाडी औटघटकेची ठरल्याचे दाखवून दिले आहे. वंचित बहुजन आघाडीला काँग्रेसने मनपा प्रमाणे जिल्हा - परिषद, पंचायत समिती निवडणुकीत सोबत न घेतल्याने हा आता हा प्रकार लातूरच्या राजकीय वर्तुळात केली जात आहे. राज्यात वंचित बहुजन आघाडीचे वर्चस्व हवे तसे न वाढण्याचे मुख्य कारण वंचितची



अशा प्रकारे राजकारण करण्याची पद्धत असल्याची चर्चा आता जोर धरत आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने बहुमत मिळविले होते. दुसऱ्या निवडणुकीत भाजपने निसटते बहुमत मिळवून महिन्यात पहिल्यांदा सत्ता मिळवली होती. मात्र, भाजपचा सत्ता स्थापनेचा हा आनंद केवळ अडीच वर्ष टिकला होता. अडीच वर्षांनंतर मनपात नाट्यमय घडामोडी घडून काँग्रेसच्या विक्रांत गोजमगुंडेची महापौर पदावर तर उपमहापौर पदावर तेव्हा भाजपचे नगरसेवक असलेले चंद्रकांत बिराजदार यांची काँग्रेसच्या सहकार्याने निवड करण्यात आली होती. मनपाच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप बहुमत मिळवेल,असा अंदाज वर्तवला जात असतानाच अनपेक्षितपणे काँग्रेसने बहुमताचा आकडा ओलांडण्याची किमया केली. याकामी काँग्रेसने वंचितसोबत केलेली आघाडी कामाला आल्याचे स्पष्ट दिसून आले. या निवडणुकीत काँग्रेसने वंचिताला केवळ पाच जागा सोडल्या होत्या. मात्र, पाच जागा लढवताना त्यातील चार जागा जिंकण्याचे काम वंचित बहुजन आघाडीने केले. काँग्रेससोबत मनपा प्रमाणे जि. प. - पं. स. मध्येही वंचितने धरली होती. मात्र काही कारणास्तव ती अपेक्षा न पूर्ण झाल्याने काँग्रेस - वंचितची ही आघाडी आता जणू तुटल्यात जमा झाली आहे. कारण काँग्रेसच्या महापौर - उपमहापौर पदाच्या उमेदवारांसमोर आपण विजयी होणार नाही, हे माहिती असूनही ही प्रक्रिया बिनविरोध होऊ द्यायची नाही, या उद्देशाने त्यांनी अनुक्रमे निकिता सोमवंशी व सचिन गायकवाड यांची उमेदवारी दाखल केली आहे.

महापौर पदी विराजमान होणाऱ्या जयश्री सोनकांबळे या प्रभाग क्रमांक १२ मधून निवडून आल्याआहेत. तर उपमहापौर पदाची संधी मिळालेले ॲड. स्नेहल उटगे प्रभाग ८ मधून निवडून आले आहेत. ॲड. स्नेहल उटगे यांचे आजोबा तमणप्पा उटगे यांनी तत्कालीन लातूर नगर परिषदेचे अध्यक्ष म्हणून तर वडील ॲड. श्रीकांत उटगे यांनी नगरसेवक म्हणूनही काम पाहिले आहे. सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महापालिका सभागृहात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सभेमध्ये महापौर व उपमहापौरांच्या निवडीची घोषणा होणार आहे.

### लातुरात दि. ११ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि. ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत लातुरात प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी दिली.

सन २०२५ -२६ या वर्षात 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन, रा. स्व. संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी समाजोन्नतीसाठी मांडलेले' एकात्म मानव दर्शन' या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि. ११ फेब्रुवारी रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे 'एकात्म मानव दर्शन' या विषयावर, दि. १२ फेब्रुवारी रोजी प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंच परिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती तर दि. १३ फेब्रुवारी रोजी विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापनदिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशिलदादा बाजपायी, योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे. ही व्याख्यानमाला दररोज सायंकाळी सहा वाजता दयानंद सभागृह, लातूर याठिकाणी होणार आहे. या व्याख्यानमालेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, उपाध्यक्ष महेंद्र जोशी, कार्यवाह अशोक शिवणे, कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी यांसह सुधीर धुत्तेकर, शैलेश कुलकर्णी, धनंजय पटवारी, संजय गुरव, सौ. प्राजक्ता देशमुख, एड. सौ. प्रणाली रायचूरकर, व्यंकटेश कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी, उमेश सेलूकर, किशोर कुलकर्णी, यांनी केले आहे.

### अभिजात फिल्म सोसायटीतर्फे रविवारी 'गांधी टॉक्स..' या सिनेमाचा विशेष शो

#### दिग्दर्शक किशोर बेळेकर राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** येथील अभिजीत फिल्म सोसायटी तर्फे गांधी टॉक्स या मूक सिनेमाचा विशेष शो दि. ८ फेब्रुवारी, रविवार रोजी दुपारी चार वाजता पिव्हीआर टॉकीज येथे आयोजित करण्यात आला आहे. या सिनेमाच्या निमित्ताने दिग्दर्शक किशोर बेळेकर उपस्थित राहणार असून चित्रपटानंतर ते प्रेक्षकांशी संवाद देखील साधणार आहेत.

गांधी विचारांना जगण्याच्या चलनात आणण्याचा एक वेगळा प्रयत्न असलेला 'गांधी टॉक्स ...' संवादविरहित चित्रपट आहे. किशोर बेळेकर या मराठी माणसाने तब्बल २४ वर्षे धडपड करून बनवलेला हा ब्लॅक कॉमेडी कला प्रकारातून उलगडणारा चित्रपट आहे. विजय सेतुपती,




अरविंद स्वामी,अदिती राव हैदरी, सिद्धार्थ जाधव अशा प्रथितयश कलाकारांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. ए. आर. रहमान यांच्या आशयपोषक संगीताने आणि पार्श्र्वसंगीताने हा सजलेला चित्रपट सर्व लातूरकरांनी पाहावा असे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीतर्फे करण्यात आले आहे.

## श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपुर्ती दिनानिमित्त महोत्सवाचे आयोजन

#### राम भक्तांनी धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आयोजकांच्या वतीने आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** प्रभू रामाच्या डाव्या मांडीवर बसलेल्या सीतामाई यांची प्रतिमा म्हणजे पट्टाभिराम मूर्ती असे पट्टाभिरामाचे महाराष्ट्रातील एकमेव मंदिर असलेल्या लातूर तालुक्यातील तपोवन कॉलनी, हणमंतवाडी, मळवटी रोड येथील श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपुर्ती दिनानिमित्त 'वर्ष परिपुर्ती दिन महोत्सव' चे आयोजन बुधवार (दि. ११) रोजी करण्यात आले आहे. वर्ष परिपुर्ती दिन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सर्व कार्यक्रमात भक्तांनी सहभागी होऊन श्री सीतासमवेत पट्टाभिराम देवतेचे कृपाआधिर्वाद प्राप्त करुन परमकल्याण करुन घ्यावे असे आवाहन श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम




वर्ष परिपूर्ती दिन महोत्सवा दरम्यान डॉ. अतुल प्रकाशराव देशमुख यांच्या हस्ते पट्टाभिरामास विशेष अभिषेक करण्यात येणार आहे. वस्त्रालंकार सेवा प्रभाकर मनोहरराव कुलकर्णी लोहटेकर तर राम नाम स्वाह:कार: बाळकृष्ण कुलकर्णी, माधवराव पाटील टाकळीकर, संजय कुलकर्णी, नवनाथ शिंदे, अमोल कुलकर्णी, सागर महाजन, अजित परळकर, किरण कुलकर्णी हे सहकुटुंब करणार आहेत. महाप्रसादाचे यजमान बाबूराव कुलकर्णी येळनूरकर व पट्टाभिराम मंदिर देवस्थान आहे. महाप्रसाद दुपारी १ नंतर सुरु करण्यात येणार आहे. श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्या प्रथम वर्ष परिपूर्ती दिन महोत्सवात सर्व रामभक्तांनी उपस्थित राहून पट्टा ग्रामदेवतेचे कृपाआशीर्वाद प्राप्त करावेत असे आवाहन हणमंतवाडी ग्रामस्थ व श्री पट्टाभिराम मंदिर देवस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

# २३ हजार ५६६ वीजग्राहकांनी स्विकारला 'गो-ग्रीन' वीजबिलांचा पर्याय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ईमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लातूर परिमंडलातील २३ हजार ५६६ लघुदाब वर्गवारीतील वीजग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेचा लाभ घेतला आहे. या वीजग्राहकांना २८ लाख २७ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणच्या लातूर




परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा* - महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिला मध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्या नंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एक रकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

### वृत्तपत्र वितरक मंडळाच्या अध्यक्षपदी राहुल करंडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०५ फेब्रुवारी :** लातूर जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी राहूल करंडे यांची तर सचिवपदी लक्ष्मण पेठकर यांची निवड झाली आहे. ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते व राज्य संघटनेचे विभागीय संघटक सचिव जगदीश उमरदंड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

शहरातील वृत्तपत्र विक्रेत्यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी वितरक विकास मंडळाच्या अध्यक्षपदी राहूल करंडे, सचिव पदी लक्ष्मण पेठकर, कार्याध्यक्षपदी बिरु हाळे, जिल्हा संघटक म्हणून दीपक कांबळे, उपाध्यक्षपदी रमेश पोपळघट, कोषाध्यक्षपदी सुधीर लहाडे, प्रसिद्धी प्रमुख परमेश्र्वर सुरवसे, अनंत सुडे व अशरफ शेख तर जाहिरात प्रमुख अनंत हाळे, सदस्यपदी मैनोदिन शेख, राजेश सूर्यवंशी, नरसिंह शेळके, मोहन माने, श्याम काटकर, बाबा विठुबोने,गणेश कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मतदानाच्या दिवशी जिल्ह्यातील १५ आठवडी बाजार बंद

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ अनुषंगाने मतदान प्रक्रिया शांततेत, निर्भय व सुरळीत पार पडावी,या उद्देशाने जिल्ह्यातील ६ तालुक्यातील १५ आठवडी बाजार ७ फेब्रुवारी २०२६ (शनिवार) रोजी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, भूम, परंडा, कळंब व वाशी या पंचायत समित्यांमध्ये मतदान होणार आहे.

मतदानाच्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी या आदेशानुसार धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.), जागजी, बामणी. तुळजापूर तालुक्यातील निलेगाव, जळकोट, आरळी (बुद्रुक). उमरगा तालुक्यातील तुरोरी, समुद्राळ, केसर जवळगा. भूम तालुक्यातील ईट. कळंब तालुक्यातील मंगरुळ, नायगाव, पिंपळगाव (कोठावळा) तसेच वाशी तालुक्यातील तेरखेडा व बावी या १५ गावांतील आठवडी बाजार मतदानाच्या दिवशी भरविण्यात येणार नाहीत.



# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रचाराची सांगता

**ग्रामीण विकास केंद्रस्थानी.... अनेक स्टार नेत्यांच्या सभा रद्द.... धाराशिव जिल्ह्यात प्रमुख पक्षांचे नेते मैदानात !...**

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**




जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा कालावधी संपल्याने प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात प्रचाराचा जोर मोठ्या प्रमणात पाहायला मिळत होता. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सभांपासून ते घरोघरी जाऊन संपर्क साधण्यावर भर दिला.

या निवडणुकीत धाराशिव जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी तसेच जिल्ह्यातील धाराशिव,तुळजापूर, भूम, परंडा, वाशी, कळंब, लोहारा, उमरगा या आठ पंचायत समितींच्या ११० गणांसाठी मतदान होणार आहे. एकूण ११ लाख ४५ हजार ८८८ मतदार या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, ही निवडणूक जिल्ह्याच्या राजकीय भविष्याचा आरसा ठरणार आहे.

या निवडणुकीत ग्रामीण विकास हा प्रमुख मुद्दा ठरला. गावातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शाळा, अंगणवाडी, स्वच्छता, तसेच शेतकरी आणि युवकांशी संबंधित प्रश्नांवरून प्रचारात चांगलीच रंगत आली. अनेक ठिकाणी विकासकामांच्या आश्वासनांबरोबरच मागील कार्यकाळातील कामगिरीवरून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. प्रचार सभांमध्ये आरोपांच्या टिकास्त्रांनी वातावरण तापले होते.

जिल्ह्यात ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून त्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग आला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून सुरक्षा व्यवस्थाही कडक करण्यात आली आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराचा कालावधी संपल्याने प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मागील काही दिवसांपासून जिल्हाभरात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.




विविध राजकीय पक्षांनी आपापल्या ताकदीचे प्रदर्शन करत प्रचारात मोठी आघाडी घेतली. भारतीय जनता पार्टीकडून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील विविध भागांत प्रचार सभा घेतल्या. सरकारच्या योजना, विकासकामे आणि भविष्यातील धोरणे यांची माहिती देत त्यांनी मतदारांशी संवाद साधला.

भाजपच्या प्रचार सभांमुळे अनेक ठिकाणी वातावरण धुराळ्याने भरले होते. शिवसेनेकडून (शिंदे गट) राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री तानाजी सावंत, संपर्क प्रमुख राजन साळवी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी सरकारची भूमिका मांडत जोरदार सभा गाजवल्या. विकासाभिमुख निर्णय, पायाभूत सुविधा आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सरकारने घेतलेल्या भूमिकेचा त्यांनी प्रचारात उल्लेख केला. काँग्रेस पक्षाकडून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी आमदार धिरज देशमुख, स्टार प्रचारक व प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांनी जिल्ह्यात प्रचार सभा घेत काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे प्रचाराला अचानक ब्रेक...**



धाराशिव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात असतानाच एक दुर्दैवी घटना घडली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यातील राजकीय वातावरणावर शोककळा पसरली असून याचा थेट परिणाम निवडणूक प्रचारावर झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक स्टार प्रचारकांच्या नियोजित सभा रद्द करण्यात आल्या. जिल्ह्यात विविध पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू असताना अचानक आलेल्या या दुःखद बातमीमुळे सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या प्रचार कार्यक्रमांना स्थगिती दिली. शोक व्यक्त करत अनेक नेत्यांनी प्रचार दौरे रद्द केले असून नियोजित सभा, पदयात्रा आणि रोड शो थांबवण्यात आले. ग्रामीण विकास, स्थानिक प्रश्न, शेतकरी, पाणीटंचाई, रस्ते आणि रोजगार या मुद्द्यांवरून प्रचार रंगला होता. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना अचानक पूर्णविराम मिळाला.

महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न आणि ग्रामीण विकासाच्या मुद्यांवरून त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून उपनेत्या सुषमा अंधारे, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील, युवा नेते ऋषिकेश मगर यांनी जिल्ह्यातील विविध ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. लोकशाही मूल्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वातंत्र्य आणि विकासकामांचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी एकाकी खिंड लढवत प्रचार केला.

मर्यादित साधनसामग्रीतून त्यांनी विविध भागांत संपर्क साधत पक्षाची भूमिका मतदारांपर्यंत पोहोचवली. आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून जिल्हा प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी यासाठी सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली असून आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी सुरू आहे. प्रचार थांबल्याने मतदार शांतपणे विचार करून मतदानाचा निर्णय घेणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### तेरणा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विशेष युवक शिबीर संपन्न

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

तेरणा महाविद्यालय, धाराशिव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पाणलोट व्यवस्थापन व पडीक जमिनीच्या शाश्वत विकासासाठी विशेष युवक शिबीर गडदेवदरी (जि. धाराशिव) येथे दि.३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. अमोल भोयटे यांनी युवकांनी सामाजिक बांधिलकी जपून कार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुळशीराम उकिरडे यांनी केले. सूत्रसंचालन मनीषा जांगीड यांनी केले तर आभार गायत्री जांगीड यांनी मानले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुशीलकुमार सरवदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच गावातील ग्रामस्थ अजय सुरवसे, मोहन बर्वे, दिनेश ताकपिरे, श्रीमंत बाबा रणखांब यांच्यासह अनेक नागरिक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

### जि.प. व पं.स. निवडणूक : मतदान केंद्रात मोबाईलला बंदी

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी २९ जानेवारी रोजी जि.प. व पं.स. सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार धाराशिव जि.प. व अंतर्गत आठ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका निश्चित वेळापत्रकानुसार पार पडणार असून, जिल्ह्यातील १,३०८ मतदान केंद्रांवर ७ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. मतदान प्रक्रियेतील शिस्त व गोपनीयता राखण्यासाठी मतदानाच्या दिवशी उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी तसेच मतदारांना मोबाईल (भ्रमणध्वनी) घेऊन मतदान केंद्रात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. मतदानाच्या वेळी मोबाईल फोन सोबत आणू नयेत, मोबाईल आढळून आल्यास मतदान केंद्रात प्रवेश नाकारला जाईल, याची नोंद मतदारांनी घ्यावी, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### वृंदावनी गवळी यांचे निधन

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

अपंग अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षा वृंदावनी बाळासाहेब गवळी यांचे



दि.४ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथे उपचार सुरू असताना सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांनी अपंग अखिल भारतीय भ्रष्टाचार समितीमार्फत अनेक अपंग बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा दिला. दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता कपिलधारा स्मशानभूमी, धाराशिव येथे वृंदावनी गवळी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. यावेळी विविध क्षेत्रातील राजकीय मंडळी, नातेवाईक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकासाला मत द्या; आम्ही विकास करून दाखवू : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.५ फेब्रुवारी -**



उमरगा-लोहारा मतदारसंघातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोहारा तालुक्यातील जेवळी येथे भव्य जाहीर सभा पार पडली.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही आम्हाला मत द्या, आम्ही विकास करून दाखवू. शेतकरी, मजूर व युवकांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी ठोस आश्वासने दिली.

ते म्हणाले की, युवकांच्या हाताला काम देण्यासाठी लोहारा तालुक्यात एम.आय.डी.सी. उभारली जाईल. स्थानिक युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

शेतकरी व मजुरांच्या विकासासाठी ठोस आणि परिणामकारक निर्णय घेतले जातील. 'लाडकी बहीण' योजना बंद होणार नाही, तसेच योजनेअंतर्गत वेतनात योग्य वेळी वाढ करण्यात येईल.

लोहारा-उमरगा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगत, महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या जाहीर सभेस जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, संपर्क प्रमुख राजन साळवी, माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सुरेश बिराजदार, भगवान देवकाते, सुरज साळुंके, अजित पिंगळे, जितेंद्र शिंदे, नगराध्यक्ष किरण गायकवाड, नगराध्यक्षा वैशाली खराडे, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, सुनील साळुंके, योगेश केदार, युवा सेना मराठवाडा निरीक्षक आकांक्षा चौगुले, बळीराम सुरवसे, जगन पाटील, अमीन सुंबेकर यांच्यासह उमरगा व लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व गणातील महायुतीचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खोटा व न वटणारा चेक दिल्याप्रकरणी आरोपीस दोन वर्षे सश्रम कारावास

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ फेब्रुवारी -**

परंडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दि.२९ जानेवारी रोजी खोटा व न वटणारा चेक दिल्याप्रकरणी आरोपीस दोन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच फिर्यादीस ४५ हजार रुपये नुकसानभरपाई, ५० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास आणखी सहा महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. यासोबतच आरोपीची मालमत्ता जप्त करून लिलावाद्वारे विक्री करून दंडाची रक्कम न्यायालयात भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

परंडा येथील श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., बार्शी शाखा (परंडा) येथून आरोपी भाऊराव बिभीषण भानवसे याने ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते.

मात्र सदर कर्जाची रक्कम मुदतीत न भरल्याने बँकेने वारंवार मागणी केली. त्यानंतर आरोपीने बँकेकडे ४४,८०७ रुपयांचा उस्मानाबाद जनता सहकारी बँक, शाखा परंडा यांचा सही केलेला चेक दिला होता. मात्र आरोपीच्या खात्यावर पुरेशी शिल्लक नसल्याने सदर चेक बाउन्स झाला. या प्रकरणाचा निकाल देताना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी डि.जी. जगताप यांनी वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली.

फिर्यादी बँकेच्या वतीने ॲड. तानाजी वाघमारे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. राहुल वाघमारे तसेच बँकेचे मॅनेजर गणेश गायकवाड यांनी सहकार्य केले.

### लाडक्या बहिणीसाठी भावाचा प्रण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ फेब्रुवारी -**

जि.प. व पं. स. निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असतानाच केसरजवळगा गणातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार ॲड. आकांक्षा चौगुले यांच्या विजयासाठी कंटेकुर येथील शिवसैनिक जागृत शिंदे यांनी उमेदवार निवडून येईपर्यंत चप्पल न घालण्याचा प्रण घेतला आहे. येत्या ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे.

## कळंब परिसरात जाणवलेला धक्का भूकंपाचा नाही : प्रशासनाची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

आज दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.०९ वाजण्याच्या सुमारास कळंब, जि. धाराशिव परिसरात भूगर्भातून गूढ आवाज होऊन भूकंपासारखा धक्का जाणवल्याची माहिती स्थानिक प्रशासनास प्राप्त झाली होती.

सदर घटनेची तात्काळ दखल घेत जिल्हा प्रशासनाने राष्ट्रीय स्तरावरील नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (छउड) यांच्याकडे पडताळणीसाठी माहिती पाठविली. त्यांच्या तपासणीनुसार संबंधित परिसरात भूकंपाची कोणतीही अधिकृत नोंद झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे ही घटना भूगर्भातील नैसर्गिक आवाजाचा प्रकार असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यासह शेजारील काही जिल्ह्यांमध्येही मागील काही दिवसांपासून अशा स्वरूपाचे भूगर्भातील आवाज ऐकू येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, नागरिकांनी घाबरून जाऊ नये, सतर्क राहावे तसेच प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व उपजत प्रतिभेला वाव मिळावा, तसेच त्यांच्यातील सुप्त कला विकसित व्हावी या उद्देशाने प्रशालेच्यावतीने २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनानिमित्त स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य के. टी. पाटील सर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. हे पूजन आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील व सरचिटणीस प्रेमाताई पाटील यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, युवा नेते तथा हातलाई शुगर लिमिटेडचे चेअरमन अभिराम पाटील, प्लाईंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या सीईओ डॉ. मंजुळाताई आदित्य पाटील, शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी दैवशाला हाके, प्राचार्य डॉ. गोरख देशमाने व प्राचार्य डॉ. गजानंद वाले उपस्थित होते. स्नेहसंमेलनात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी व मराठी गीतांवरील नृत्य, गायन, एकांकिका, लावणी नृत्य तसेच गोंधळी गीतांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्राचार्य नंदकुमार नन्नवरे यांनी भूषविले. यावेळी उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक यशवंत इंगळे, बी.बी. गुंड, बी.एम. गोरे, प्रा. विनोद आंबेवाडीकर, कैलास कोरके, मोहन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

### ओबीसी, विमुक्त व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व योजनांचे अर्ज सुरु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत प्रवेश अर्ज सन २०२५-२६ पासून सुरू करण्यात आले आहेत.

अर्ज करण्याचा कालावधी ६ फेब्रुवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ असा असून ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर करावयाचे आहेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, धाराशिव यांनी केले आहे.

## डॉ. सरोजनी राऊत यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा

**संत ज्ञानेश्वर म.निवासी मूकबधिर आश्रम शाळेत शालेय साहित्य तसेच मिठाई वाटप**



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ फेब्रुवारी -**

श्रीलक्ष्मी सेवाभावी संस्था, हसेगाव (शि.) ता. कळंब यांच्या अध्यक्षा डॉ. सरोजनीताई राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त कळंब येथील संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर आश्रम शाळेत शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत यांनी केले. त्यांनी डॉ. सरोजनीताई राऊत यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत समाजासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी ज्येष्ठ महासंघाचे जिल्हाध्यक्ष हभप. महादेव महाराज आडसूळ यांनी मनोगत व्यक्त करत सामाजिक कार्याचे महत्त्व विशद केले. समाजातील दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य हेच खरे ईश्वरसेवा असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास एहसास फाउंडेशनचे अध्यक्ष वाजेद तांबोळी, उपाध्यक्ष आदिल सय्यद, सचिव अमन शेख, आरेफ शेख, तोफीक सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे प्राचार्य जाधवर, आडसूळ व कोठावळे यांचे सहकार्य लाभले.

हा कार्यक्रम डॉ. सरोजनीताई राऊत विचारमंच, धाराशिव व एहसास फाउंडेशन यांच्या विशेष परिश्रमातून आनंदी व उत्साही वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

## अग्रलेख...

# गोपनीयतेचा ‘बाजार’ ‘मेटा’कुटीला...!

‘डेटा’ हे २१ व्या शतकातील तेल आहे, हे सुप्रसिद्ध वाक्य सर्वप्रथम क्लाईव्ह हंबी या ब्रिटिश गणितज्ञाने २००६ मध्ये वापरले होते. त्यानंतर एका मासिकाने २०१७ मध्ये यावर एक ‘कव्हर स्टोरी’ करून ही संकल्पना जगभरात नेली. पण हे ‘तेल’ काढताना जर देशाच्या गोपनीयतेच्या जमिनीलाच तडे जात असतील, तर तसा व्यापार आम्हाला मान्य नाही. सार्वभौमत्व हे नफ्यापेक्षा केव्हाही श्रेष्ठच आहे, हा विचार भारतीय संदर्भात प्रामुख्याने न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांच्या समितीने मांडला. भारताच्या वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याचा मसुदा तयार करताना त्यांनी ‘डेटा सार्वभौमत्व’ यावर विशेष भर दिला होता. त्याचप्रमाणे, सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील आणि सायबर कायदेतज्ज्ञ पवन दुग्गल यांनीही अनेकदा कंपन्यांचा नफा हा भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांपेक्षा मोठा असू शकत नाही, हे स्पष्ट केले आहे.

आता मात्र ‘सर्वोच्च’ आदेश आल्याने यात कुठल्याही शंकेला जागाच उरली नाही. ‘डेटा शेअरिंग’च्या नावाखाली भारतीय नागरिकांच्या गोपनीयतेच्या हक्काशी अजिबातच खेळ करता येणार नाही. आम्ही एकाही शब्दाचा ‘डेटा शेअर’ करू देणार नाही, असा कडक इशारा सर्वोच्च न्यायालयाने अमेरिकेतील टेक-जायंट ‘मेटा’ आणि ‘व्हॉट्सॲप’ला दिला, हे फारच चांगले झाले. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचा आदेश केवळ एका कायदेशीर प्रक्रियेचा भाग नाही, तर तो बदलत्या भारताच्या बुलंद आत्मविश्वासाचा हुंकारही आहे. ‘‘तुम्ही नियमांचे पालन करणार नसाल, तर येथून गाशा गुंडाळा’’, या शब्दांत न्यायालयाने या कंपन्यांना हासडले. भारताच्या ‘डिजिटल’ सीमांच्या रक्षणासाठी असे रणशिंग फुंकणे आवश्यकच होते. भारत बलशाली असून येथील नागरिकांचीच नव्हे, तर त्यांच्या गोपनीयतेच्या हक्काचीही सुरक्षा करायला हा देश सक्षम असल्याचे हे संकेत आहेत. कुणीही या देशाला केवळ बाजारपेठ समजून येथील नागरिकांच्या अगतिकतेचा फायदा घेऊ शकत नाही, त्यांच्या गोपनीयतेचा बाजार मांडू शकत नाही, अशा आशयाच्या या इशाऱ्याने ‘मेटा’ आणि ‘व्हॉट्सॲप’च्या पायाखालची वाळू सरकली नसेल तर नवल. कारण आज भारत जगातील सर्वांत मोठी ‘डेटा फॅक्टरी’ आहे. ‘व्हॉट्सॲप’च्या जागतिक नकाशावर नजर टाकली, तर हा देश त्यांचा सर्वांत मोठा बालेकिल्ला दिसतो. आकडेवारीनुसारच बघितले तरी, भारतात हे ॲप वापरणाऱ्यांची संख्या ५५ कोटींच्या पार गेली आहे. जगातील एकूण ‘व्हॉट्सॲप’च्या वापरकर्त्यांपैकी जवळपास २५ ते ३० टक्के वाटा एकट्या भारताचा आहे. केवळ ‘मेसेंजर’ म्हणून नव्हे, तर ‘व्हॉट्सॲप पे’ आणि ‘व्हॉट्सॲप बिझनेस’च्या माध्यमातून ही कंपनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या नसानसांत शिरली आहे. ज्या देशाने या कंपनीला इतका अवाढव्य नफा आणि व्यासपीठ दिले, त्याच देशाच्या कायद्यांना वाकुल्या दाखवण्याचे धाडस हे कसे करू शकतात? हा प्रश्न आज प्रत्येक स्वाभिमानी भारतीयाच्या मनात आहे. त्याचेच प्रतिबिंब सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात आले आहे.

२०२३-२४ च्या आर्थिक आकडेवारीनुसार, मेटा इंडियाच्या जाहिरात महसुलात आणि निव्वळ नफ्यात फार मोठी वाढ झाली आहे. २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात मेटा इंडियाचा एकूण महसूल २४.१ टक्क्यांनी वाढून २२ हजार ७३० कोटी रुपये झाला. या तुलनेत, २०२४-२५ मध्ये या कंपनीचा एकूण महसूल ३० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडल्याचा अंदाज आहे. ही वाढ ३० ते ३२ टक्के असून, ती प्रामुख्याने ‘व्हॉट्सॲप बिझनेस’ आणि ‘इन्स्टाग्राम रिल्स’वरील जाहिरातींमुळे झाली आहे. या आर्थिक वर्षात मेटा इंडियाचा निव्वळ नफा ६०० कोटी रुपयांच्याही पार जाण्याची दाट शक्यता आहे. मागील वर्षीच्या ४५० कोटींच्या तुलनेत ही सुमारे ३५ टक्के अधिक आहे! हा नफा डोळे पांढरे करणारा आहे. एवढा महसूल गोळा करणारी ही कंपनी भारताला केवळ एक बाजारपेठ समजत आली असून, हा नफा कमावून देणाऱ्या भारतीयांच्या ‘प्रायव्हसी’वरही आता मेटाचा डोळा आहे. याला कमालीची कृतघ्नता म्हणावी लागेल. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ही चपराक या अवाढव्य नफ्याच्या उन्मादात वागणाऱ्यांना ‘मेटा’कुटीला आणण्यासाठी आवश्यक होती. भारतातून होणारी कोट्यवधी रुपयांची कमाई एका बाजूला असताना, दुसऱ्या बाजूला येथील वापरकर्त्यांचा डेटा आपल्या मर्जीनुसार परदेशातील ‘सर्व्हर’वर वळवण्याची मेटाची ही खोड म्हणजे ‘डिजिटल वसाहतवाद’ होय. इंग्लंडच्या ईस्ट इंडिया कंपनीने एकेकाळी जे केले, तेच नव्या तंत्रज्ञानाच्या युगात मेटा करू पाहत आहे आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, जर तुम्हाला या विशाल बाजारपेठेत व्यवसाय करायचा असेल, तर येथील ‘लॉ ऑफ लॅण्ड’ पाळावाच लागेल. आपण आता केवळ बाजारपेठ नसून, जागतिक धोरणे ठरवणारे शक्तिस्थान आहोत. अमेरिकेलाही अनेक क्षेत्रांत मागे टाकण्याची क्षमता असलेला हा देश जेव्हा संयमीपणे पण ताकदीने निर्णय घेतो, तेव्हा अमेरिकेलाही त्याचे हादरे बसतात. आत्ताच्या ‘टॅरिफ’ बदलाने हे सिद्धही केले आहे. भारताने ‘डेटा प्रोटेक्शन ॲक्ट’च्या माध्यमातून स्वतःची ढाल आता अधिक मजबूत केली आहे. २०१७ च्या पुट्टास्वामी खटल्याचा निकाल यासंदर्भात महत्त्वाचा टप्पा आहे. ‘निवृत्त न्यायमूर्ती के. एस. पुट्टास्वामी विरुद्ध भारत सरकार’ या खटल्यात ९ न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने निर्णय दिला आणि गोपनीयतेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत एक मूलभूत अधिकार आहे, हे अधोरेखित केले. कोणतीही खाजगी कंपनी किंवा सरकार नागरिकांच्या संमतीशिवाय त्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावू शकत नाही, हे स्पष्ट झाले. या आधारे, ‘‘तुम्हाला भारतात अशा पद्धतीने व्यवसाय करता येणार नाही’’, ही सर्वोच्च न्यायालयाने दिलेली तंबी केवळ ‘व्हॉट्सॲप’साठी नाही, तर प्रत्येक परदेशी कंपनीसाठी आहे, जी भारतीय नागरिकांच्या गोपनीयतेचा भंग करू पाहत आहे. व्हॉट्सॲप आपल्या ‘प्रायव्हसी पॉलिसी’मध्ये बदल करून वापरकर्त्यांचा डेटा, लोकेशन आणि व्यवहारांची माहिती इतर प्लॅटफॉर्मशी शेअर करण्याचा घाट घालत असेल, तर त्यावर नियंत्रण मिळवणे हे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही आवश्यक आहे. ‘एंड-टू-एंड एन्क्रिप्शन’च्या नावाखाली पडद्यामागे काय चालते, याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. ‘व्हॉट्सॲप’ने २०२१ मध्येच आपल्या सेवा अटी बदलण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार, वापरकर्त्यांचा काही डेटा फेसबुक (मेटा) सोबत शेअर करणे अनिवार्य केले. तेव्हाही सर्वोच्च न्यायालयाने आणि भारतीय स्पर्धा आयोगाने कडक आक्षेप घेतले होते. तुम्ही अब्जावधी डॉलर्सची कंपनी असाल तरी लोकांची गोपनीयता पैशांपेक्षा कितीतरी मोठी आहे, असे स्पष्ट केले होते. २०२३ मध्ये केंद्र सरकारने ‘डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन’ कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार, जर एखादी कंपनी भारतीय नागरिकांच्या डेटाचा गैरवापर करीत असेल, तर त्या कंपनीवर २५० ते ५०० कोटी रुपयांपर्यंत दंड लादला जाऊ शकतो. पण मेटासारख्या कंपनीने याकडे दुर्लक्ष केले आणि शेवटी ओटीटी मेसेजिंगमध्ये गैरवापर केल्याबद्दल मेटाला २१३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला गेला. या दंडाविरोधात या कंपनीने न्यायालयात दाद मागितली आहे. त्यावर ९ फेब्रुवारीला अंतरिम आदेश येणार आहे.

या कंपन्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, भारत आता केवळ एक ‘पॅसिव्ह कंझ्युमर’ राहिला नाही. या देशाकडे आता स्वतःचे कडक कायदे आहेत. ‘व्हॉट्सॲप’ला येथे टिकायचे असेल, तर त्यांना ‘आयटी नियम २०२१’ आणि ‘डेटा संरक्षण कायदा’ यांचे पालन करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांच्यावर बंदी घालण्याचा अधिकार सरकारकडे सुरक्षित आहे. मेटा कंपनी युरोपच्या कडक नियमांचे पालन करते, कारण तेथे दंड खूप मोठा आहे. सर्वोच्च न्यायालयाने याच मुद्द्यावर बोट ठेवले आहे. जे नियम तुम्ही युरोपमध्ये पाळता, तेच नियम येथे पाळावेसे कां वाटत नाही? हा प्रश्नही समोर आला. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेचे संपूर्ण देश स्वागत करीत आहे. आता चेंडू ‘मेटा’च्या कोर्टात आहे. नियमानुसार व्यवसाय करायचा की मुजोरी करून गाशा गुंडाळायचा, हा सर्वस्वी त्यांचा निर्णय आहे. पर्यायी व्यवस्था करायला भारत देश सक्षम आहे.

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# लघुउद्योगांसाठी ‘जेम पोर्टल’

आपल्या देशाचा सार्वजनिक खरेदी खर्च ३४० अब्ज रुपये आहे. हा खर्च वार्षिक ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट (जीडीपी) च्या १५ ते २० टक्के इतका आहे. या सरकारी व्यवसायात पुरवठादार होणे हे अनेकांचे स्वप्न असते. आता तर ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’सारख्या योजनांमुळे आयात कमी करण्यावर सरकारचा भर आहे, पण केंद्र आणि राज्य खरेदी संस्थांमध्ये अनेकदा अकार्यक्षमतेचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण केल्याने विविध विकास योजना आणि प्रकल्पांसाठी संसाधने कमी किमतीत खरेदी करण्यात मदत होऊ शकते. अनेक लघुउद्योग सरकारी पुरवठादार होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अनेकांना त्याची प्रक्रिया अवघड आणि अनेक अडथळ्यांची वाटते. त्यामुळे अनेक जण त्याचा नाद सोडतात आणि इतरत्र प्रयत्न करतात. भारतातील एकूणच व्यवसायसुलभतेला चालना देण्यासाठी सरकारने अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. आजच्या स्पर्धात्मक जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी या उपाययोजनांनी लहान व्यापारी आणि उत्पादकांना मदत केली आहे. लहान व्यापारी आणि उत्पादकांना सक्षम करण्यासाठी भारत सरकारने एक पारदर्शक ‘ई-मार्केटप्लेस’ सुरू केले आहे. त्याला ‘जेम’ म्हणून ओळखले जाते. केंद्र शासनाने राष्ट्रीय खरेदी धोरणांतर्गत खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. शासकीय वस्तू आणि सेवा खरेदीसाठी केंद्र शासनाने हे पोर्टल विकसित केले आहे. हे पोर्टल एका ‘स्पेशल पर्पज व्हेईकल’द्वारे व्यवस्थापित केले जाते.

केंद्रीय वाणिज्य विभागाअंतर्गत विभाग ८ (सेक्शन ८) कंपनी त्यासाठी स्थापन केली आहे. यासाठी पात्रतेचे निकष तसे सोपे आहेत. बोली सादर करण्याच्या शेवटच्या तारखेनुसार, बोलीदाराने संबंधित क्षेत्रातील अनुभवासह किमान गेल्या चार वर्षांपासून भारतात कार्यरत असणे आवश्यक आहे. बोली लावणाऱ्याची सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल किमान रुपये ५० लाख असावी. ‘जेम पोर्टल’ हा एक ऑनलाईन प्लॅटफॉर्म आहे, जिथे विविध सरकारी विभाग आणि सरकारी मालकीच्या उपक्रमांद्वारे सामान्य वापराच्या वस्तू आणि सेवांच्या ऑनलाईन खरेदीची सुविधा असते. हे २०१६ मध्ये पारदर्शक, कार्यक्षम आणि जलद सार्वजनिक खरेदीद्वारे लहान आणि स्थानिक व्यवसायांसाठी ग्राहकांना सुरक्षित करण्यासाठी सुरू करण्यात आले . हे पोर्टल ई-बिडिंग, रिव्हर्स ई-ऑक्शन आणि मागणी एकत्रीकरणासाठी साधने पुरवते, जेणेकरून खरेदीदार आणि विक्रेते या दोघांनाही वाजवी दर मिळण्यास मदत होईल. सर्व पुरवठादारांसाठी सर्वसमावेशक बाजारपेठेचा विचार करून सार्वजनिक सरकारी खरेदीमधील प्रक्रियेवर सकारात्मक परिणाम करणे हे त्याचे ध्येय आहे. तथापि, पोर्टल नोंदणी अत्यावश्यक आहे. जेम पोर्टलवरील विक्रेते मालकी /भागीदारी/प्रोप्रायटरी उद्योग, स्टार्टअप्स किंवा अगदी लिमिटेड कंपन्या असू शकतात. ते त्यांच्या मालाची सरकारी संस्थांद्वारे खरेदीसाठी पोर्टलवर सहजपणे यादी मांडू शकतात आणि सरकारी बोली आणि लिलावांमध्ये भाग घेऊ शकतात. सामान्य आर्थिक नियम, २०१७ मध्ये नवीन नियम क्रमांक १४९ जोडून सरकारी युजर्सद्वारे जेम पोर्टलद्वारे खरेदी वित्त मंत्रालयाने अधिकृत आणि अनिवार्य केली आहे. जेम पोर्टलवर व्यवहार करायचे काही फायदे आहेत.

डिजिटली सक्रिय मार्केटप्लेस म्हणून हे पोर्टल सर्व सरकारी विभाग तसेच विक्रेत्यांसाठी अगदी सहज आणि थेट उपलब्ध आहे. विक्रेत्यांसाठी विपणनाचे (मार्केटिंग) प्रयत्न बरेच कमी झाले आहेत. विक्रेत्यांना विविध शासकीय विभागांच्या निविदांचे पालन करण्याची गरज नाही. एकदा त्यांनी त्यांची उत्पादने ऑफर केली की, सरकारी विभाग स्वतः विक्रेत्यांशी संपर्क साधतात. पुरवठादाराच्या किंवा विक्रेत्याच्या हमी किंवा वॉरंटीविरुद्ध स्वीकारलेली उत्पादने नियमित माल तपासणी, चाचणी आणि मूल्यमापन प्रक्रियेपासून मुक्त असतात. विक्रेते त्यांच्या उत्पादनांची वैशिष्ट्ये स्व-परिभाषित करण्यास मोकळे आहेत. शिवाय, या उत्पादनांमध्ये कोणती वैशिष्ट्ये असावीत किंवा नसावीत यावर कोणतेही निर्बंध नाहीत. विक्रेते त्यांची उत्पादने कधीही आणि त्यांना पाहिजे तितक्या वेळा अपग्रेड करू शकतात. वर्षातील कोणत्याही वेळी बाजाराच्या परिस्थितीनुसार उत्पादनांच्या किमती वाढवता किंवा कमी केल्या जाऊ शकतात. त्यामुळे विक्रेत्यांना कच्च्या मालाच्या किमतीतील चढउतारांची किंवा विनिमय दराच्या मूल्यांची भीती बाळगण्याची गरज रहात नाही, कारण त्याचा बोजा खरेदीदारांवर सहज टाकला जाऊ शकतो.

जेम पोर्टलवर विक्री करण्यासाठी, संबंधित खरेदीदार आणि विक्रेत्यांना ऑनलाईन जीईएम पोर्टल नोंदणी (रजिस्ट्रेशन) करावी लागेल. त्यासाठी व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीचे पॅनकार्ड आणि आधार कार्ड, व्यवसायाच्या अधिकृत प्रतिनिधीची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी मागील तीन वर्षांच्या प्राप्तिकर विवरणपत्रांची प्रत, व्यवसाय इन्कॉर्पोरेशन आणि कॉर्पोरेट ओळख प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचे एमएसएमई प्रमाणपत्र किंवा संबंधित व्यवसायाचा उद्योग आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास), व्यवसायाचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, संबंधित व्यवसायाच्या रद्द केलेल्या चेकच्या प्रतीसह बँक खाते तपशील, व्यवसायाच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या जागेचा पत्ता पुरावा आदी दस्तावेज/ओळखपत्रे आवश्यक आहेत. जेम पोर्टलवर खरेदीदार किंवा विक्रेता म्हणून नोंदणी पूर्णपणे विनामूल्य आहे. भारत सरकार नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारत नाही. तथापि, सल्लागार किंवा एजंट नियुक्त केला आणि तो नोंदणी करत असल्यास त्याचे सल्लागार शुल्क भरावे लागेल.

जेम पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर, विक्रेत्यांना आपली उत्पादने किंवा सेवा निर्दिष्ट श्रेणींमध्ये सूचीबद्ध कराव्या लागतात. पोर्टलवर त्याचे तपशील देऊन ऑर्डर प्राप्त झाल्यावर माल पाठवणाऱ्या व्यक्तीला वितरित करणे आवश्यक आहे. ऑर्डर वितरित केल्यानंतर प्रेषणकर्ता उत्पादनाची तपासणी करून ऑनलाईन स्वीकृती किंवा नकार जारी करतो. ‘कन्साइनी’ ऑर्डर स्वीकारतो तेव्हा तो/ती ‘कन्साइनी’ची पावती आणि स्वीकृती प्रमाणपत्र तयार करतो. ते जारी केल्यानंतर खरेदीदार बिलावर प्रक्रिया करतो आणि ते देयक प्राधिकरणाकडे पाठवतो. ऑर्डर स्वीकारल्यापासून दहा दिवसांच्या आत देय रक्कम अदा केली जाते. जेम पोर्टलवर सर्व खरेदी प्रक्रिया ऑनलाईन आणि पारदर्शकतेने पार पाडल्या जातात. यामुळे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार कमी होण्यास मदत होते.

जेम पोर्टलमुळे खरेदी प्रक्रियेतील कागदपत्रे आणि इतर औपचारिकता कमी होतात. त्यामुळे वेळ आणि पैशाची बचत होते. पोर्टलवर विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे खरेदीदारांना त्यांच्या गरजेनुसार योग्य वस्तू आणि सेवा निवडण्यास मदत होते. इथे स्थानिक विक्रेत्यांना सरकारी खरेदीमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन असते. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

### सोनाली पवन ठेंगडी

# ‘खेळ’ जीवन-मृत्यूचा

घातपात, अपघात, आत्महत्या याच्या बातम्या फार ठळकपणे द्यायच्या नाहीत, असा दंडक बरीच माध्यमे पाळताना दिसतात. हा नियम प्रत्येक माध्यमाने आपल्या संवेदनशीलतेतून बनवला आहे. कारण अशा बातम्यांनी एक विचित्र नकारात्मकता येते, असे निरीक्षण नोंदविण्यात आले. पण, कधी कधी समाजहितासाठी अशा घटनांच्या वृत्ताला प्राधान्यक्रम द्यावा लागतो. गाझियाबादमध्ये तीन सख्ख्या बहिणींनी ऑनलाईन गेमच्या व्यसनापायी आत्महत्या केली. दुसरीकडे, भोपाळमध्ये एका आठवीतील मुलाने याच कारणातून स्वतःला संपवले. काही वर्षांपूर्वी पब्जी या गेममुळे अनेक किशोरांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या होत्या. याच्या बातम्या सातत्याने समोर आल्यानंतर सरकारने त्यावर बंदी आणली. आता पुन्हा ऑनलाईन गेमचे जीवघेणे प्रकार समोर येत आहेत. गाझियाबादमध्ये १२ ते १६ वयोगटातील तीन सख्ख्या बहिणींनी एकापाठोपाठ एक वरच्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केल्याची घटना तर फारच धक्कादायक आहे. आता त्यांचे वडील म्हणताहेत की, या मुली पाच वर्षांपासून कोरियन गेम खेळत होत्या. घरातील त्यांचे प्रत्येक काम त्या खेळातील आदेशानुसार चालायचे. त्यांच्यावर या खेळाचा इतका प्रभाव होता की त्यांनी स्वतःदेखील कोरियन नावे धारण केली होती.

विरंगुळा म्हणून अधूनमधून खेळले जाणारे हे खेळ आता मुलांच्या जिवाशी खेळत आहेत. या पृष्ठभूमीवर सर्वच संबंधितांनी अंतर्मुख होऊन सारासार विचार केला पाहिजे.



अलिकडच्या काळात पॉकेमॉन जगभर गाजला. मात्र, कित्येक खेळगडी अपघातात जायबंदी झाले तेव्हा आभासी जगात भरधाव वेगाने ओढत नेणाऱ्या या खेळातला धोका कळला. या मुद्द्यावर समस्त पालकांनी गांभीर्याने अंतर्मुख व्हायला हवे आणि अशा स्वरूपाच्या घटना टाळायच्या असतील तर पाल्याची केवळ ‘फिजिकल ऑटोप्सी’च नव्हे, तर ‘सायकॉलॉजिकल ऑटोप्सी’देखील करायला हवी, असे वाटते. म्हणजेच मुलांच्या भावविश्वात पालकांनी तसेच शिक्षकांनी संवेदनशीलतेने डोकावले पाहिजे.

नुकतेच दररोज १२ तास कॉम्प्युटर गेम खेळणारा किशोरवयीन मुलगा दिल्लीतील रुग्णालयात दाखल झाला. कारण काय, तर या खेळाच्या नादात त्याची सारासार विचार करण्याची शक्तीच खुंटली. झोप, कुटुंबीयांशी संवाद जणू बंदच झाले. आता त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अशा नादावलेल्या मुलांना वेळीच सावरले नाही तर घरोघरी खुनी खेळाचे डाव रंगतील हे सांगायला का हवे? विशेष म्हणजे, या जीवघेण्या खेळांपैकी अनेक खेळ असे आहेत ज्यांत अट असते की, पालकांशी बोलू नका. यावरून आपण पालकांच्या मुलांशी असलेल्या संवादाचे महत्त्व ओळखले पाहिजे. आपली मुले अर्धवट समजाच्या स्थितीत असताना त्यांची मानसिकता गोंधळलेली असते. अशा वेळी त्यांच्याशी संवाद साधण्याची कसरत पालकांनीच केली पाहिजे. त्यात जर पालक यशस्वी झाले तर मुलांसोबतचा त्यांचा संवादसेतू नेहमीसाठी सांधला जातो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या शताब्दी वर्षानिमित्त समाजाला दिलेल्या पंचसूत्रीमध्ये कुटुंब प्रबोधन हा मुद्दा प्रकर्षाने मांडण्याची गरज आता निर्माण झाली आहे. कारण माणसाची पहिली जडणघडण ही कुटुंबातच होते. आपण पाश्चिमात्यांप्रमाणे कुटुंबापासून विलग होत नाही. तेथे मुलांना फार लवकर कुटुंबापासून वेगळे काढून स्वावलंबनाच्या नावाखाली जगाशी लढण्यासाठी मोकळे सोडले जाते. तो टक्केटोणपे खात जगत असतो. कुटुंबाला त्याच्या या संघर्षाशी जणू काहीच देणेघेणे नसते. आपल्या भारतीय समाज व्यवस्थेत सुदैवाने अशी वेळ अजून आलेली नाही. आपल्याकडे आजही कुटुंबाला फार महत्त्व आहे. किंबहुना कुटुंबव्यवस्था हे आपल्या समाजाची घडी नीट ठेवण्याचे मुख्य कारण आहे. सुख-दुःखाच्या काळात सोबत उभे राहणारे कुटुंब मोठा आधार ठरते. त्यामुळे आपली कुटुंबव्यवस्था सांभाळण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांशी संवाद प्रस्थापित करणे आणि त्याद्वारे त्यांना जीवन योग्य पद्धतीने जगण्यासाठी प्रोत्साहित करताना ‘आम्ही आहोत’ हा विश्वास निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. असे झाले तर जगातील कोणताही खेळ आपल्या नव्या पिढीच्या भावनांशी आणि जीवाशी खेळण्याची हिंमतही करणार नाही. या आणि पुढील प्रत्येक पिढीच्या पाठीशी भक्कम पाठिंबा म्हणून कुटुंब उभे राहील. ही आता काळाची गरज आहे.

७७५५९३८८२२

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# देशातील महिला उपमुख्यमंत्री

राष्ट्रवादी काँग्रेसचे धडाडीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रातील महायुतीच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची संपूर्ण सूत्रेही पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून लवकरच त्यांच्या हातात येतील, हे निश्चित आहे. या घटनाक्रमाने सुनेत्रा पवार याच दादांच्या राजकीय उत्तराधिकारी आहेत, हे स्पष्ट झाले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांनी पराभव केल्यामुळे सुनेत्रा पवार यांना राज्यसभेत यावे लागले. सध्या त्या राज्यसभेच्या सदस्य आहेत. उपमुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात पदार्पण केल्यामुळे पवार यांना राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागणार आहे आणि शपथ घेतल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभा वा विधान परिषदेवर निवडून यावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत अनेक नेत्यांचा उपमुख्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला, यात नाशिकराव तिरपुडे, सुंदरराव सोळंकी, रामराव आदिक, गोपीनाथ मुंडे, विजयसिंह मोहिते पाटील, छगन भुजबळ, आर. आर. पाटील, अजितदादा पवार यांचा समावेश आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही उपमुख्यमंत्रिपद भूषवले आणि एकनाथ शिंदे तर विद्यमान उपमुख्यमंत्री आहेत, पण या दोघांच्या उपमुख्यमंत्री होण्यात थोडा गुणात्मक फरक आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे दोघेही आधी मुख्यमंत्री होते आणि नंतरच्या राजकीय घडामोडीत त्यांना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले. अन्य नेत्यांची मजल मात्र उपमुख्यमंत्रिपदाच्या वर गेली नाही.

१९७८ पासून २०२६ पर्यंत महाराष्ट्रात १५ उपमुख्यमंत्री होऊन गेलेत. यात सर्वाधिक म्हणजे सहा वेळा अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवले. नाशिकरराव तिरपुडे हे महाराष्ट्रातील पहिले उपमुख्यमंत्री आहेत. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात चार-पाच महिन्यांसाठी तिरपुडे उपमुख्यमंत्री होते. सुंदरराव सोळंकी हे राज्यातील दुसरे उपमुख्यमंत्री. शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात सोळंकी उपमुख्यमंत्री होते. वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात बॅ. रामराव आदिक उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्रातील युती सरकारच्या कार्यकाळात गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री होते. मनोहर जोशी आणि नारायण राणे अशा दोन मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात मुंडे उपमुख्यमंत्री होते. छगन भुजबळ विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे आणि अशोक चव्हाण या तीन मुख्यमंत्र्याच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री होते. सुशीलकुमार शिंदे यांच्या मंत्रिमंडळात विजयसिंह मोहिते पाटील यांनाही उपमुख्यमंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली. विलासराव देशमुख यांच्या सरकारमध्ये आर. आर. पाटील उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वाधिक म्हणजे सहावेळा अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद भूषवले. यातील दोनवेळा ते पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात तर प्रत्येकी एकदा उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्री होते. देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातही दादांना दोनदा उपमुख्यमंत्रिपद भूषवता आले. अजितदादा पवार ११ नोव्हेंबर २०१० ला पहिल्यांदा उपमुख्यमंत्री झाले, त्यानंतर एखाददुसरा अपवाद वगळता २०२६ पर्यंत ते सलग उपमुख्यमंत्री होते. चार मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात जवळपास बारा वर्ष दादांनी महाराष्ट्रात उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्रिपद सांभाळण्याचा विक्रम महाराष्ट्रातच नाहीतर देशातही जसा दादांच्या नावावर आहे, तसाच सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त पाच दिवस उपमुख्यमंत्री राहण्याचा विक्रमही दादांच्याच नावावर नोंदला गेला आहे.

आता दादांनंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री झाल्या. सुनेत्रा पवार या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. पक्षाचा विचार केला तर सर्वाधिक उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे झाले. त्यानंतर काँग्रेसचे तीन, भाजपाचे दोन तर शिवसेनेचा एक झाला. नाशिकराव तिरपुडे, सुंदरराव सोळंकी आणि रामराव आदिक हे तीन उपमुख्यमंत्री काँग्रेसचे होते. गोपीनाथ मुंडे आणि देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री भाजपाचे होते, तर एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे आहेत. छगन भुजबळ, विजयसिंह मोहिते पाटील, आर. आर. पाटील आणि अजितदादा पवार हे सर्व उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे होते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार केला तर एकही उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री झाला नाही. सर्वच उपमुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांचा याला अपवाद यासाठी म्हणावा लागेल की हे दोघेही आधी मुख्यमंत्री होते, नंतर त्यांना राजकीय तडजोड म्हणून उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले.

मुळात घटनेत कुठेही उपमुख्यमंत्रिपदाची तरतूद नाही. राजकीय सोय म्हणून युती आणि आघाडीच्या राजकारणात तसेच पक्षांतर्गत संतुलन राखण्यासाठी म्हणून हे पद निर्माण करण्यात आले. उपमुख्यमंत्र्याचा दर्जा हा सर्वांत वरिष्ठ कॅबिनेट मंत्र्याचाच असतो. एका कॅबिनेट मंत्र्याला जो दर्जा आणि अधिकार असतात, तेवढेच उपमुख्यमंत्र्यालाही असतात, त्यामुळे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्याला उपमुख्यमंत्री म्हणून नाही तर कॅबिनेट मंत्री म्हणूनच शपथ दिली जात असते. देशातील अनेक राज्यात राजकीय सोय आणि सत्तासंतुलन राखण्यासाठी उपमुख्यमंत्रिपद निर्माण केले जाते. काही राज्यांत एक तर काही राज्यांत दोन उपमुख्यमंत्री असतात. सध्या महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांत दोन उपमुख्यमंत्री आहेत. काही वर्षांपूर्वी आंध्रप्रदेशात जगनमोहन रेड्डी यांनी आपल्या मंत्रिमंडळात पाच उपमुख्यमंत्री ठेवले होते. रागलोभ आणि राजीनाराजी नको म्हणून प्रत्येक जातीच्या नेत्याला त्यांनी उपमुख्यमंत्री केले होते.

देशाच्या इतिहासात आतापर्यंत एकच उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री झाला, तो म्हणजे पंजाबच्या राजिंदर कौर भट्टल. नंतर महाराष्ट्रातीलच नाही तर देशातीलही कोणत्याही उपमुख्यमंत्र्याला मुख्यमंत्री होण्याचे भाग्य लाभले नाही. ६ ऑगस्ट १९९६ ते २१ नोव्हेंबर १९९६ या काळात भट्टल पंजाबच्या उपमुख्यमंत्री होत्या. विशेष म्हणजे मुख्यमंत्री झाल्यानंतरही त्यांनी ६ जानेवारी २००४ ते १ मार्च २००७ या काळात दुसऱ्यांदा पंजाबच्या उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. देशाच्या राजकारणात आतापर्यंत आठ महिलांना उपमुख्यमंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली. यात जमुनादेवी (मध्यप्रदेश), कमला देवी (राजस्थान), पमुला पुष्पा श्रीवाणी (आंध्रप्रदेश) आणि रेणुदेवी (बिहार) यांचा समावेश आहे. मध्यप्रदेशच्या उपमुख्यमंत्री असलेल्या जमुनादेवी यांनी सर्वाधिक म्हणजे ५ वर्ष ७ दिवस उपमुख्यमंत्रिपद सांभाळले. कमला बेनीवाल सर्वांत कमी म्हणजे फक्त ३१७ दिवस राजस्थानच्या उपमुख्यमंत्री होत्या. सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री झाल्यामुळे देशातील विद्यमान महिला उपमुख्यमंत्र्यांची संख्या तीन झाली आहे. सध्या प्रभाती परिदा या ओडिशाच्या तर दियाकुमारी या राजस्थानच्या महिला उपमुख्यमंत्री आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या सर्वेसर्वा आहेत. त्यामुळे त्या एकाचवेळी सरकार आणि पक्षावरही आपली पकड ठेवू शकतात. याचा त्यांना त्यांच्या दीर्घकालीन राजकीय कारकीर्दीत फायदा होऊ शकतो.

९८८१७१७८१७

## कचारगड यात्रा : आदिवासी संस्कृतीच्या अस्मितेचा वारसा

कचारगड ही मध्य भारतातील आदिवासी समाजाची अत्यंत पवित्र, ऐतिहासिक व सांस्कृतिक भूमी आहे. महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्यप्रदेश यांच्या सीमेलगत घनदाट जंगलात वसलेली ही विशाल नैसर्गिक गुहा गोंड समाजाच्या श्रद्धेचे केंद्र मानली जाते. गोंड आदिवासी जमातीच्या दृष्टीने कचारगड ही केवळ धार्मिक आस्था नसून आदिवासी संस्कृती, जीवनमूल्ये आणि निसर्गपूजक जीवनदर्शन यांचे जिवंत प्रतीक आहे. येथे माता काली कंकाली आणि पहांदी पारी कुपार लिंगो यांच्याशी संबंधित लोककथा व परंपरा खोलवर रुजलेल्या आहेत. दरवर्षी माघ पौर्णिमेला होणारी कचारगड यात्रा ही उत्सवापेक्षा अधिक ती जिवंत इतिहास, सामूहिक स्मृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचा महोत्सव आहे. या यात्रेच्या माध्यमातून आदिवासी संस्कृतीचे विविध पैलू लोकनृत्य, लोकगीते, पारंपरिक वेशभूषा, अनुभवकथन आणि सामाजिक संवादातून सजीवपणे प्रकट होतात.

कचारगड हे ठिकाण महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात अतिदुर्गम व घनदाट जंगलांनी वेढलेल्या डोंगररांगांमध्ये स्थित आहे. गोंदियापासून सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कडेला वसलेल्या या लेणी म्हणजे नैसर्गिक गुहांची एक भव्य मालिका असून त्या पूर्णपणे नैसर्गिकरीत्या घडलेल्या आहेत आणि आशिया खंडातील सर्वांत मोठ्या गुहांपैकी एक मानल्या जातात. या गुहा अश्मयुगीन काळातील असून सुमारे २५ हजार वर्षे जुन्या असल्याचा अभ्यासकांचा अंदाज आहे. लोककथांनुसार आदिवासी समाजाचा उगम कचारगडाच्या या गुहेतून झाला असल्याचं मानलं जातं आणि येथे आढळलेले पाषाणयुगीन मानवी अवशेष या मान्यतेला ऐतिहासिक संदर्भ प्रदान करतात. त्यामुळे कचारगड हे केवळ धार्मिक स्थळ न राहता ऐतिहासिक व मानववंशशास्त्रीय दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाचं ठिकाण ठरते. गोंड आदिवासी समाजासाठी कचारगड हे पवित्र श्रद्धास्थान असून दरवर्षी येथे पाच दिवस चालणारी कचारगड यात्रा भरते. या यात्रेमध्ये महाराष्ट्रासह देशातील सुमारे १८ राज्यांमधून लाखो आदिवासी बांधव सहभागी होतात. ऐतिहासिकदृष्ट्या या लेण्या मानवी वसाहतींच्या प्राचीन पुराव्यांचे संकेत देतात तर सांस्कृतिकदृष्ट्या कचारगड हे गोंड आदिवासी समाजाच्या धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिक ओळखीचे अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्र मानले जाते. म्हणूनच आज कचारगड ही केवळ धार्मिक घटना न राहता सामाजिक जागृती आणि सांस्कृतिक आत्मभानाचा एक महत्त्वाचा आधार ठरते.

**करुणा महादेव आडे**/७३८५७४०४५५

## वाचक पत्रे

## महाशिवरात्री : शिवाच्या प्रत्येक नामतत्त्वाची उपासना

आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनात मनःशांती, स्थैर्य आणि सकारात्मकतेची गरज प्रत्येकालाच भासते. अशा काळात भारतीय संस्कृतीत पूज्य मानलेले भगवान शिव हे केवळ देव नसून, ते जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन करणारे तत्त्व आहेत. संयम, त्याग, करुणा आणि अंतर्मुखता ही मूल्ये शिवतत्त्वातून सहज समजतात. म्हणूनच आधुनिक युगातही शिवउपासना अधिक अर्थपूर्ण ठरते. आपल्या हिंदू धर्मात शिवनवरात्र कृष्णपक्ष पंचमी ते माघ कृष्णपक्ष चतुर्दशीपर्यंत, म्हणजे ५ ते १५ फेब्रुवारी एकूण अकरा दिवस साजरे केले जाते. या काळात शिवाच्या विविध नावांमधील आध्यात्मिक अर्थ समजून घेऊन उपासना करण्यास विशेष महत्त्व आहे. ‘शिव’ हा शब्द ‘वश्’ या शब्दापासून वर्णव्यत्यास पद्धतीने तयार झाला आहे. ‘वश्’ म्हणजे प्रकाश. जो स्वतः प्रकाशस्वरूप आहे आणि संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो, तो शिव होय. शिव म्हणजे मंगलमय आणि कल्याणकारक तत्त्व. शिव म्हणजे ब्रह्म आणि परमशिव म्हणजे परब्रह्म.

शिवाच्या नावांतून जीवनमार्गदर्शन : भगवान शिवाचे प्रत्येक नाव हे केवळ नाव नसून, ते जीवनासाठी एक संदेश देतात. शंकर हे नाव सर्वांचे कल्याण करण्याची भावना शिकवते. महाकालेश्वर काळाचे भान ठेवून जगण्याचा बोध देतो. महादेव परिपूर्ण पावित्र्य, ज्ञान आणि साधना यांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो. भालचंद्र संयम व अंतर्मुखतेचे प्रतीक आहे. गंगाधर संकटे शांतपणे पेलण्याची शिकवण देतो. करपूरगौर शुद्धता व सात्त्विकतेचे दर्शन घडवतो. पिंगलाक्ष त्रिकालदर्शी दृष्टिकोन दर्शवतो. अघोर भय व चिंता यांपासून मुक्त राहण्याचा संदेश देतो, तर नीलकंठ दुसऱ्याच्या दुःखासाठी त्याग करण्याची प्रेरणा देतो. आशुतोष भक्ती, नम्रता आणि श्रद्धेचे महत्त्व अधोरेखित करतो. शिवरात्रीच्या काळात शिवतत्त्व पृथ्वीतलावर हजार पटीने अधिक प्रमाणात कार्यरत असते, असे शास्त्रात सांगितले आहे. त्यामुळे या काळात ‘‘ॐ नमः शिवाय’’ हा नामजप केल्यास उपासकाला अधिक आध्यात्मिक लाभ होतो. शिवपूजेत बिल्वपत्र अर्पण करताना १०८ वेळा नामजप करून ती अर्पण करावीत. तसेच शिवाला पांढरी फुले अर्पण करावीत. शिवाच्या नावांमधील अर्थ समजून श्रद्धेने उपासना केल्यास मानसिक शांतता व स्थैर्य प्राप्त होते. तणाव, भीती व चिंता कमी होतात. करुणा, संयम आणि सकारात्मकता वाढते. जीवनाकडे पाहण्याचा कल्याणकारी दृष्टिकोन तयार होतो. या शिवनवरात्रात शिवतत्त्व आत्मसात करून उपासना केल्यास, आधुनिक जीवनातही संतुलन, समाधान आणि मनःशांती निश्चितच प्राप्त होते.

**रमा देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए –३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी –८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# चारित्र्य हा माणसाचा सर्वात मोठा दागिना आहे : शि.भ.प. धोंडिराज महाराज

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** चारित्र्य हा माणसाचा सर्वात मोठा दागिना आहे असे बहुमोल विचार शि.भ.प. धोंडिराज महाराज यांनी व्यक्त केले.

एस.टी.कॉलनी नविन वसाहत मलकापूर येथे ओंकारेश्वर महादेव मंदिरात शिवलिंग व नंदी प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा निमित्त शि.भ.प. धोंडिराज महाराज गंगापुरकर यांचे शिव किर्तन संपन्न झाले.

शंकर हे नाम सुखाचे सदन भाऊ बाधाय जाय चुके येणे भ्रांतीचा पडदा शिवकृपे निघे समाधान या अभंगाव किर्तन करताना म्हणाले की, देवाला सदाचार प्रिय आहे प्रज्ञा पुरुषाची लक्षणे आहेत सदाचार व नामात लीन राहणे संसाराची गुरुकिल्ली असुन दृष्टी बदला सृष्टी बद्दल विचार बदला नशीब बदलेल, शंभर वेळा खोटे बोलण्यापेक्षा एक वेळा खरे बोला तुम्ही किती जगलात यापेक्षा कसे जगलात याला महत्व आहे.

वय व पैसा मोजल्या जात नाहीत कारण मोजलेल्या वस्तूचा नाश होतो नशिबावर अवलंबून न राहता कृतत्वावर विश्वास ठेवा या पद्धतीत वागला तर जीवन कथाअर्थ होते. सुनेला मुली सारखे वागवा, गाड्या मोठी इमारत यांना श्रीमंत म्हणू नका ज्या घरात वृद्ध मंडळी हसत आनंदाने आहेत ते घर श्रीमंताच समजा ज्या घरात वृद्ध मंडळी हसून आनंदाने आहेत ते घर श्रीमंताचा समजा. असे बहुमोल विचार किर्तनातून शि.भ.प.धोंडिराम महाराज गंगापुरकर यांनी व्यक्त केले.

या शिव किर्तनासाठी वादक कपिल तलखेडकर,गायक भिमाशंकर भुरे शिराढोण, संजय चव्हाण लाळी व योगेश इंगळे राजूळा यांच्या गायन वादनाने उपस्थित तल्लीन झाले होते. यावेळी बनशेळकी,विरशैव महिला भजनी मंडळ पिंपरी,गंगापूर,समतानगर, सिध्दरामेश्वर, शिवशक्ती आदी महिला भजनी मंडळांनी भाग घेतला.

ईरम्मा अशोक कवडगावे, वेष्णवी संगमेश्वर कड्डे, सौ.सरस्वती विष्णूकांत हलबर्गे, सौ.अंजली सुनिल पाटिल, सौ.शितल दिगंबर बिरादार, सौ. रेश्मा सुरेश राजपाल यांचे हस्ते आरती संपन्न झाली.

ओंकारेश्वर महिला भजनी मंडळाच्या मार्गदर्शक श्रीमती जगदेवी पोस्ते, अध्यक्ष सौ.सरस्वती हलहबर्गे, सचिव सौ. वनमाला कप्ते, उपाध्यक्षा श्रीमती सुनिता कड्डे, सौ.शितल बिरादार, सौ.मिनाताई हलकुडे सह महिला भजनी मंडळाचे सदस्य प्रयत्न करत आहेत.

शुक्रवार दि.६ फेब्रुवारी रोजी शिव लिंग, नंदी प्राणप्रतिष्ठा व कलशा रोहण सोहळा ष.ब्र. १०८ डॉ.शंभुलिंग शिव-ाचार्य महाराज यांचे शुभ हस्ते संपन्न होणार आहे. व ११ वाजता प्रसादाचे किर्तन ष.ब्र. डॉ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे होणार आहे.



# राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष शिबिर दापका येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** निलंगा शहरातील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे दापका तालुका निलंगा येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २४ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरित्या संपन्न झाले. सात दिवसीय शिबिराच्या समारोप कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एस. व्ही. उसनाळे तसेच दापका येथील ग्रामस्थ शिव-ाजी भोपी, ज्ञानोबा घाडगे, शिवाजी लाटे, मधुकर भोपी, देविदास भोपी, वैजनाथ लाटे, सुभाष घाडगे, डॉ. माधव शेटकार, डॉ. संतोष कुंभार, रा से यो कार्यक्रमाधिकारी डॉ. सु-नील गरड व महाविद्यालयातील प्राध्यापक, रा से यो स्वयंसेवक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. सद-रील शिबिर हे जलसंधारण आणि



ओसाड भूमी विकास या विषयावरती विशेष भर देऊन पूर्ण करण्यात आले. याचबरोबर स्वच्छता, वृक्षरोपण, महिला सबलीकरण, पशु रोग तपासणी, आरोग्य तपासणी, सायबर सुरक्षा, एड्स जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावरती विविध मार्गदर्शकाद्वारे समुपदेशन करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणामध्ये प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील म्हणाले की, तरुणाई ही धाडसी असते, ती कधीच भीत नसते, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण व विद्वत्ते शिवाय पर्याय नाही. निरंतर प्रयत्न हाच विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग आहे तसेच युवक आकाशाला गव-सणी घालण्याचे कार्य करू शकतात. ग्रामसंस्कृती व रा से यो चे अनन्य साधारण महत्व आहे. श्रमासाठी झपाटलेले विद्यार्थी पाहायला मिळत नाहीत अशीही खंत त्यानी यावेळी व्यक्त केली.

समारोपाच्या दिवशी वृक्षारोपण करून झाडाना ट्री गार्ड लावण्यात आले. सात दिवसीय विशेष संस्कार शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन दापका येथे केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री विजय पाटील निलंगेकर यांनी अभिनंदन केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनोद उसनाळे डॉ. रविराज मोरे, डॉ. सी. व्हि. पांचाळ, प्रा.सुजित पवार, प्रा. नंदा भालके, प्रा. प्रीती माकणे, प्रा. शिवराज हुनसनालकर, तंत्रज्ञ नारायणसिंह राजपूत व सर्व स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. मीनाक्षी बोंडगे यांच्या 'हर्बेरियम' ग्रंथाचे प्रकाशन

## वनस्पतीशास्त्र आणि पर्यावरणशास्त्र साहित्यात भर पडणार

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** महाराष्ट्र महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ .मीनाक्षी बोंडगे यांच्या 'हर्बेरियम' या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. महाविद्यालयीन परिसरात २०० पेक्षा जास्त विविध प्रजातीच्या वृक्षवेलींची लागवड करण्यात आली असून त्यात दुर्मिळ, औषधी, आणि लुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या वनस्पतीं-चा समावेश आहे. वनस्पतींच्या



विविधतेचे दस्तऐवजीकरण करणे, संशोधनासाठी माहितीचा स्रोत निर्माण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या ग्रंथाची निर्मिती केल्याचे डॉ. बोंडगे यांनी सांगितले. महाविद्यालयात २०० वनस्पतींचा संग्रह जतन केला आहे. या संग्रहाचा वनस्पतींचे वर्गीकरण, उत्पत्ती, अधिवास, वितरण, विप-ुलता, विविधता आणि उत्क्रांती यांचा अभ्यास करण्यासाठी निश्रि्चत उपयोगी होईल असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांनी हा ग्रंथ दर्जेदार असून वनस्प-तीशास्त्र, कृषी, पर्यावरणशास्त्र आणि संशोधनासाठी उपयुक्त असल्याचे सांगून डॉ. बोंडगे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड,प्रा. प्रशांत गायकवाड आणि महाविद्यालयातील शिक्षक वृंद उपस्थित होता.

### जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने

# पोलिसांचा रूट मार्च

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव दि. ०५ फेब्रुवारी :** निवडणुकीत कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी किनगाव पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. त्यासाठी तगडा पोलिस बंदोबस्त राहणार आहे. त्यानुषंगाने किनगाव येथील पोलिस ठाणे स्तरावर मोठ्या फौजफाट्यासह येथील मुख्य रस्त्यावरून रूट मार्च काढण्यात आला.

गुन्हेगार आणि सामाजिक तत्वांवर दबाव निर्माण करण्यासाठी पोलिस अनेक उपाययोजना करत आहेत.महत्त्वाच्या मार्गावरून पोलिसांनी रूट मार्च काढला. यामध्ये संबंधित किनगाव पोलीस स्टेशन चे सपोनी मानीकराव डोके साहेब यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अधिकारी, होमगार्ड, पोलीस स्टेशनचे इतर अधिकारी अंमलदारांचा समावेश होता.



# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल, लातूर येथे नुकताच शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा ''विश्वोत्सव२०२६'' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांच्या हस्ते पार पडले. गटशिक्षणाधिकारी लातूर श्री. शेख सी. आर. तसेच मेट्रोबेन एज्युकेअर प्रा. लि., लातूरचे संचालक श्री. संतोष लोहार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. शिवचरण धाराशिवे होते, तर संस्थेचे सचिव तसेच शाळेचे प्राचार्य श्री. बसवराज धाराशिवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच वासनगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती नंदा आचार्य यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, विश्वनाथ निलंगेकर, दिलीप आडे, कथक डान्स अकॅडमी, लातूरच्या संचालिका श्वेता तंत्रे, सारिका शिरसेकर, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला येथील प्राचार्य प्रशांत धाराशिवे, योगेश धाराशिवे,



शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे तसेच ब्ल्यू बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक नृत्य, ऐतिहासिक कला, नाटक व गीत-संगीताच्या माध्यमातून आपल्या अंगी असलेल्या सप्तकला गुणांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच क्रीडा व अबॅकस स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गटशिक्षणाधिकारी श्री. शेख सी. आर. यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, लातूरचे प्राचार्य किशोर जेवे यांनी शाळेच्या प्रगतीविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली देशमुख यांनी विद्यार्थी व शिक्षकांच्या सहकार्याने केले. कार्यक्रमाच्या शेवटी विश्वेश्वरय्या ज्युनिअर कॉलेज, लातूरचे प्राचार्य अमोल कुंभार यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले.

# अंधश्रध्देची भक्ती पतनाकडे नेणारी : कैलास महाराज जामकर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ फेब्रुवारी :** निष्काम भक्तीने साक्षात्कार होत-ो चमत्कार नाही. मन्मथ स्वामींनी साक्षात्कार सांगीतला, चमत्कार सांगीतला नाही,साक्षात्कार आत्मत्वात होतो, आत्मतत्वाची भक्ती करा, कर्म चांगले करा कुण्या भोंदू बाबा कडे जाण्याची गरज नाही असे बहुमोल रोखठोक विचार शि.भ.प. कैलास महाराज जामकर यांनी किर्तनातून मांडले.

एस.टी.कॉलनी नविन वसाहत मलकापूर येथे ओंकारेश्र्वर महादेव मंदिरात शिवलिंग व नंदी प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा निमित्त शि.भ.प. कैलास महाराज जामकर यांनी तया भावे शरण जावे सदा वाचे नाम घ्यावे शिवाचे या अभंगावर शिव सप्ताहातील शिवकिर्तनाचे चौथे पुष्प गुंफले.

विविध दृष्टांत देत कैलास महार-ाज म्हणाले की,

संत शिरोमणी मन्मथ स्वामींनी अंधश्रध्देच्या भक्तीला कधीही थारा दिला नाही भक्तीला प्राधान्य दिले



भक्ती श्रध्देंने करावी अंधश्रध्देने करु नये.वैभव लक्ष्मीची पोथी वाचल्याने वैभव प्राप्त होत नाही तर कष्ट केल्याने वैभव येते,श्रध्देसाठी वाचा धनासाठी नको श्रध्देच्या बाह्य अंगाची भक्ती देखाव्याची असुन देखाव्याची भक्ती करु नका,निष्काम भावाने शरण जावा वाचेने नाव घ्या जीवाच शिव व्हायला वेळ लागणार नाही,जीवनात चांगले कर्म करा जिवणात समस्याच येणार नाही,संत तत्वात अनुभवाला महत्व आहे असे सांगून १२ शतकात महात्मा बसवण्णानी भक्तीची वर्णवादी परंपरा मोडित काढली.

भगवंताच्या प्राप्तीचे स्वातंत्र बसवेश्र्वरांनी दिले भारतीय शास्राच्या दर्शन शास्र यातीत पहिले महात्मा गौतम बुध्द आहेत दुसरे महात्मा बसवणा आहेत,प्रत्येक संत नेहमीच महात्मा असतो,महात्म्याच्या विच-ाराने क्रांती घडते संत महात्म्याने जड जिवाचा उद्दार होतो.अनुभवाच्या बोलण्यात शक्ती आहे म्हणून संतत्व जगात महान आहे.

ईश्वराला शरणवृत्ती प्रिय असुन शरण वृत्ती ठेवा,अंतकरणात भाव ठेवा, शरण आल्यामुळे सर्व दोष दुर होतात

वाचे भगवंताचे नाव घ्या ,भक्ती करताना शिवा शिवाय कल्याणाचा दाता जगात नाही,जिवनाचे कल्याण करायचे असेल तर शिवाला मनोभावे शरण जावा सर्व भक्तीचे सार भगवंताचे नामात आहे. नामा शिवाय भक्तीला अर्थ नाही, भक्ती निष्काम करा आपल्यामुळे दुसर्याला त्रास होईल असे वागू नका, निष्काम भावाने शरण जावे हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ती असे बहुमोल विचार व्यक्त केले. यावेळी वनमाला अशोक कप्ते, उदय कप्ते,मंजू कप्ते, अनुसया शिवराज स्वामी यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. श्रीमती पोस्ते, सौ.छाया स्वामी,श्रीमती सुगला बावगे, सौ.ललिता कप्ते, श्रीमती मिना बावगे, श्रीमती उमादेवी हलकंचे, सौ.उमा कमठाणे, सौ.प्रिती महेश तोडकर, किरण तोडकर,सौ. शालू साखरे, सौ.शिला धानूरे, सौ. सुधा तिवारी, सौ.अयोध्या जाधव, सौ.स्वर्णा माळेवाडे, सौ.आशा नागराळकर,सौ.पुनम तिवारी, सौ. स्वर्णा गलबले, सौ.भारती गिरी, सौ.शितल बिरादार,सरुबाई हलबर्गे, श्रीमती सुनिता कड्डे यांच्या सह शिवभक्त परिश्रम घेत आहेत.

# स्थानिक परिसराच्या संशोधनात विद्यार्थ्यांची भूमिका मोलाची - डॉ. अनिल जायभाये

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ फेब्रुवारी :** स्थानिक परिसराच्या संशोधनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भूमिका मोलाची असून आपण केलेल्या संशोधनाचा समाजाला निश्रि्चत उपयोग झाला पाहिजे असे प्रतिपादन डॉ.अनिल जायभाये (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - उपकेंद्र लातूर) यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मादीमं संशोधन अकादमीच्या वतीने दि.४ फेब्रुवारी रोजी 'संशोधनातील नवीन क्षेत्र' या विषयावर आयोजित



अतिथी व्याख्यानाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर डॉ.निशिकांत वारभुवन, मादीमं संशोधन अकादमीचे समन्वयक डॉ.आनंद मुसळे, डॉ.अशोक नारन-वरे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.अनिल जायभाये यांनी माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, प्राथमिक साधने, संदर्भ ग्रंथ इत्यादीचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपण रहात असलेल्या स्थानिक परिसराचे शास्त्रीय संशोधन केले पाहिजे. तसेच समाजातील विषमता, अंधश्रद्धा, दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी इत्यादी समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी त्यांचा सखोल अभ्यास करून या समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळेस डॉ.निशिकांत वारभुवन यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद मुसळे यांनी केले व उपस्थितांचे आभार डॉ.अशोक नारनवरे यांनी मानले. यावेळी डॉ.अनिल जायभाये यांनी महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण विभागास 'संघर्ष गाथा' हा ग्रंथ भेट दिला. याप्रसंगी डॉ. जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, डॉ. शीतल गुंजटे, डॉ.सुचिता किडीले, डॉ. सत्यशीला जोंधळे, प्रा.अंजना मुळे, प्रा.आकांक्षा मुळे, प्रा.पल्लवी डोंगरगावे, पूनम सुर्यवंशी, रुपेश मोरे, विजयकुमार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि , माझे पक्षकार **क्षिरसागर सुहास लक्ष्मण , रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **सौ विद्या आण्णासाहेब पवार , रा. फादर मायकेल सोसायटी ,विश्रांतवाडी ,पुणे** यांनी खरेदी खत दस्त क्र. ल. त. र – २-६३००/२००९ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवाहिवाटीचा खुला प्लॉट मौ. चांडेश्वर ता. जि लातूर येथील जमीन गट नं ६० मधील खुला प्लॉट ज्यांचा एन. ए नं. २००६/जे . एम . बी /लातूर /सी . आर -८५७ ,दि- ०५/१२/२००६ ई . अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस ,लातूर यांनी मंजूर केलेला खुला प्लॉट याचा ले आऊट क्र. एल . टी. आर/एन. ए /सर्वे नं ६०/लातूर /एन. आर. एल/१७६३, दि.२७/११/२००६ ई. अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा खुला प्लॉट नं.८१(पूर्ण) याची लांबी पूर्व –पश्चिम १७ मी व रुंदी दक्षिण-उत्तर १२ मी . याचे एकूण क्षेत्रफळ २०४. चौ.मी आहे. प्लॉट चतु:र्सिमा - पुर्वेस - गट ६१ मधील जमीन, पश्चिमेस – ९ मी रुंदीचा रस्ता , दक्षिणेस - प्लॉट क्र ८२ उत्तरेस – प्लॉट क्र ८०

येणे प्रमाणे वरील चतु : सिमेच्या आतील मिळकत खरेदी करणेचा **लेखी** करार केला असुन ठरावापोटी ईसारा रक्कम दिलेली आहे तसेच सदरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखिम असल्याची हमी विध्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे तरी सदर मिळकतीवर जर कोणाचा उजर , हक्कसंबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीस, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन **सात ( ७ )** दिवसांचे आत माझ्या खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप आला नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निर्जोखिम समजुन माझे पक्षकार नोंदनिकृत खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक - ०२/०२/२०२६

तर्फे. ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो. न. ९४२११९८६४९५

जाहिर प्रगटन देणार
क्षिरसागर सुहास लक्ष्मण
**रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर**
मो.नं.८६०५५५६५६७ / ७७७४८७२१४६

# गटविकास अधिकाऱ्याविरोधात उबाठा शिवसेनेचे भीक मागो आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ फेब्रुवारी**

औंढा नागनाथ येथील पंचायत समिती अंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे मंजूर करण्यासाठी तसेच कामाचे अनुदान खात्यावर वर्ग करण्यासाठी गट विकास अधिकाऱ्याकडून पैश्याची मागणी केली जात असल्याच्या आरोप करीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून भिकमागो आंदोलन करण्यात आले. यावेळी 'बीडीओ साहेब पैसे घ्या पण अनुदान द्या' अश्या आशयाचे टी शर्ट घालून निषेध व्यक्त केला.

औंढा नागनाथ पंचायत समिती कार्यालयात लाभार्थ्यांची मोठ्याप्रमाणात आर्थिक लूट केली जात असून पैसे दिल्याशिवाय एमआरइजीएस अंतर्गत सिंचन विहीर, जनावरांचा गोठा, घरकुल, कुरण योजना, आदी वैयक्तिक लाभांच्या योजनेसाठी प्रशासकीय मान्यतेपासून अनुदान वर्ग करेपर्यंत वारंवार पैश्याची मागणी केली जात असल्याचा आरोप करीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून गट विकास अधिकारी विरोधात गुरुवारी ता. ०५ फेब्रुवारी रोजी भीक मागो आंदोलन करण्यात आले.

येथील बसस्थानक परिसरातून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोर्चा काढून आठवडी बाजारातून घोषणाबाजी करीत पंचायत समिती कार्यालयासमोर मोर्चा आणण्यात आला. तत्पूर्वी पोलिस प्रशासनाने पंचायत समितीचे मुख्य प्रवेशद्वार बंद करून कार्यालयाबाहेर बंदोबस्त तैनात केला होता. पंचायत समिती कार्यालयाच्या बाहेर पक्षाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, सुनील काळे, अनिल कदम, तालुकाध्यक्ष माऊली झटे, बबनराव इघारे आदींनी उपस्थितांना संबोधित केले व यानंतर सहाय्यक प्रशासन अधिकारी राधेश्याम परांडकर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यामध्ये घरकुल लाभार्थ्यांचे थकीत हप्ते त्वरित त्यांच्या खात्यावर वर्ग करावे व लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

याप्रसंगी यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संदेश देशमुख, शिवसेना नेते सुनील काळे, माजी तालुकाप्रमुख वसमत अनिल कदम, महिला उपजिल्हाप्रमुख उषा चव्हाण, औंढा तालुकाप्रमुख अनिल दादाराव शिंदे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर उर्फ माऊली झटे, शहर प्रमुख संजय भामीरगे पाटील, बबनराव इघारे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष (शरद पवार गट) रमेश सानप, सुनील खंडागळे, अलीम खातीब,सुदामराव खोकले, चंद्रमणी पाईकराव, शिवाजी क-हाळे, भल्ला कोकाटे, रवी डोंगरदिवे, आकाश सुतारे, संतोष रेणके, सुदामराव वैद्य यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी बनावट नोटांची उधळण करीत निषेध व्यक्त केला.

यावेळी पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक अमोल इंगोले, पोलीस उपनिरीक्षक अफसर पठाण, पोलीस उपनिरीक्षक यशवंतराव गुरुपवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पंजाबराव थिटे, जमादार सुभाष जैताडे,शेख इकबाल यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी बंदोबस्त ठेवला होता.

# अट्टल दरोडेखोरांची आंतरजिल्हा टोळी स्थागुशाकडून जेरबंद

## ३० लाखांचा सोन्याचांदीचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ फेब्रुवारी**

सेनगाव हद्दीतील धानोरा शिवारात दि ३० जानेवारी रोजी महामार्गावर कापडसिंगी ते लोणार मार्गावर सराफा सुरेश खंदारकर यांना चाकुचा धाक दाखवून त्यांच्याकडील रोख रकमेसह सोन्याचांदीचे दागिने असा ३० लाखांचा मुद्देमाल लंपास केला. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेने मोठ्या शिताफीने करीत सहा आरोपींना अटक करीत त्यांच्याकडून ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहीती पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव हद्दीतील धानोरा शिवारात दि ३० जानेवारी रोजी कापडसिंगी ते लोणार या महामार्गावर सराफा सुरेश संभाजी खंदारकर वय ३७ रा लोणार जि बुलढाणा हे कापडसिंगी येथील त्यांचे सोन्याचांदीचे दुकानाचे कामकाज आटोपून सोबत सोन्याचांदीचे दागिने घेवून मोटार सायकलने लोणारकडे जात असतांना एका मोटार सायकलवर अनोळखी तीन इसमांनी त्यांचा पाठलाग करून त्यांची मोटार सायकल खाली पाडून खंदारकर यांना चाकूचा धाक दाखवून बळजबरीने ११४ ग्रॅम सोने व ३६०० ग्रॅम चांदीचे दागिने, मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ३० लाखांचा मुद्देमाल लुटून पसार झाले होते. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, यांनी घटनास्थळी भेट देत गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवला. स्थागुशाचे पोनि मोहन भोसले, सपोनि शिवसांब घेवारे, सपोनि दिपक मस्के, उपनि रविकिरण खंदारे यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. पोलिसांनी सखोल तपास करून गोपनीय बातमीदार, सीसीटीव्ही फुटेज यांच्या आधारे सदरचा गुन्हा हा परमेश्वर उर्फ सागर साहेबराव पडोळेकर, राहुल मोहन पवार, शोएब हमीद पठाण, अभिषेक प्रल्हाद धनवडे, भगवान विनायक हराळ, तुकाराम पुंजाराम हराळ यांनी कट रचून केला असल्याची खात्रीशीर माहीती मिळाली. पथकांनी वाटूर फाटा येथून चार आरोपींना ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांना सराफाची टीप देणारे दोन हराळ आरोपी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीकडून गुन्ह्यातील चोरलेला ११ तोळे ४ ग्रॅम सोने व ३ किलो ६०० ग्रॅम चांदीचे दागिने, मोबाईल असा एकूण ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर आरोपींपैकी काही आरोपींनी यापूर्वी कापडसिंगी येथील बँक फोडल्याचे सुध्दा तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई सपोनि शिवसांब घेवारे, उपनि दिलीप मोरे, सपोनि दिपक मस्के, उपनि रविकिरण खंदारे, अंमलदार भूजंग कोकरे, पांडुरंग राठोड, नितीन गोरे, गजानन पोकळे, संदीप जाधव, दत्ता नागरे, साईनाथ कंठे, शिवाजी जालमीरे, शिवाजी इंगोले, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, ज्ञानेश्वर गोरे, प्रदीप झुंगरे, मारोती काकडे, प्रणीता मोरे, इरफान पठाण, जालनाचे स्थागुशाचे अंमलदार फुलचंद गव्हाणे, सुधीर वाघमारे, परतुरचे पोउपनि नंदु खंदारे, अंमलदार देवीदास जाधव, लोणावळाचे उपविपोअ गजानन टोम्पे, पोनि दिनेश तायडे यांनी केली आहे.

# स्थायी व विषय समित्यांच्या निवडीसाठी विशेष सभा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ४ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराला दिशा देणाऱ्या महत्त्वाच्या टप्प्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.नगरपरिषदांच्या दैनंदिन प्रशासनाचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थायी समिती व विविध विषय समित्यांच्या गठनासाठी सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष सभा आयोजित करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्राद्वारे मुख्याधिकारी नगरपरिषद वसमत यांना दिले आहे.

या विशेष सभेमध्ये नगरपरिषदांच्या स्थायी समितीबरोबरच बांधकाम, नगररचना, आरोग्य व स्वच्छता, पाणीपुरवठा व मलनिस्सारण, शिक्षण व सांस्कृतिक, महिला व बालकल्याण, वित्त व करआकारणी अशा विविध विषय समित्यांचे सभापती व सदस्यांची निवड होणार आहे. या समित्यांवर निवड होणारे नगरसेवक आगामी कालावधीत नगरपरिषदेच्या विकासकामांवर, निधी वितरणावर तसेच धोरणात्मक निर्णयांवर थेट प्रभाव टाकणार असल्याने या निवडींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

विशेष म्हणजे, स्थायी समितीवर वर्चस्व मिळवणे म्हणजेच प्रत्यक्ष सत्तेची चावी आपल्या हाती घेण्यासारखे असल्याने, सत्ताधारी व विरोधी गटांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असते. कोणत्या विषय समितीचे सभापतीपद कोणाच्या वाट्याला जाणार, कोणाला डावलले जाणार आणि कोणत्या नगरसेवकाला निर्णायक भूमिका मिळणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू आहेत.

या विशेष सभेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात येत असून, सभेच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेतली जात आहे. नगरपरिषदेच्या आगामी पाच वर्षांच्या कारभाराची दिशा या समित्यांच्या निवडीवर अवलंबून असणार असल्याने, ही विशेष सभा केवळ औपचारिक न राहता राजकीय शक्तिप्रदर्शनाचे केंद्र ठरण्याची शक्यता आहे.

वसमत तालुक्यातील नागरिकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष या विशेष सभेकडे लागले असून, ९ फेब्रुवारीनंतर तालुक्यातील नगर राजकारणात नवे समीकरण उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त वृत्त

### कर्करोग दिनानिमित्त तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा



हिंगोली- जागतिक कर्करोग दिनानिमित्त, दि ४ फेब्रुवारी बुधवारी नशामुक्त भारत अभियान अंतर्गत, नशामुक्त भारत अभियान समिती, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने, सरस्वती निकेतन हायस्कूलमध्ये तंबाखु-तंबाखूजन्य पदार्थ दुष्परिणामाबाबत सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांचे प्रबोधपर उपक्रम पार पडले. विद्यार्थी-विद्यार्थीनींना तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली. नशाबंदी मंडळ प्रकाशित तंबाखू दुष्परिणाम दर्शविणारे चित्र प्रदर्शन पार पडले. मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षीका, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. प्रारंभी सामुदायिक राष्ट्रगीत संपन्न झाले.

### हिवरखेडा जि प शाळेवर शिक्षक देण्याची मागणी

हिंगोली-हिवरखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान हात असल्याचा आरोप करीत रिपब्लीकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांच्या नेतृत्वात विद्यार्थी आणि पालकांनी दि ४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन करीत घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांनी शांतता राखण्याचे आवाहन करीत गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्यामुळे कार्यकर्ते, पालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्यात शाब्दीक वाद निर्माण झाला होता. या इशाऱ्यानंतरही घोंगडे, पालक, विद्यार्थी शिक्षकांच्या मागणीवर ठाम भूमिका घेतली. अखेर शिक्षक देण्याचे आश्वासन देण्यात आले.

### श्री चिंतामणी गणपती दर्शनासाठी रांगा



हिंगोली- शहरातील गड्डीपीर गल्लीतील नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी संकष्ट चतुर्थी निमित्त भाविकांच्या गुरूवारी सकाळपासूनच रांगा लागल्या होत्या. यावेळी मंदिर संस्थानच्यावतीने दर्शनासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती. हजारो भाविकांनी श्री विघ्नहर्ता चिंतामणीचे दर्शन घेतले.

# एबीएम इंग्लीश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिली न्यायालयाला क्षेत्रभेट, न्यायधीशांना विचारले प्रश्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ फेब्रुवारी**



येथील एबीएम इंग्लिश हायस्कूल सीबीएसईच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा व व सत्र न्यायालयास भेट देवून न्यायालयीन प्रक्रियेची चाकोरी जाणून घेतली. यात एकाने तर जजसाहेब, तुम्ही राजकीय दबावात येवून निर्णय देता का? असा थेट सवाल केला.

एबीएम शाळेची क्षेत्रभेट जिल्हा न्यायालयात झाली. विद्यार्थ्यांच्या मनात न्यायालयीन प्रक्रियेविषयी मोठे कुतुहल असल्याचे पहायला मिळाले. शिवाय ही प्रक्रिया कशी चालते? न्यायधीशांची निवड कशी होते? आदी प्रश्नही त्यांना पडले होते. समर्थ मसळे याने तर राजकीय दबावात येवून निर्णय देता का? असा सवाल केला. त्यावर न्यायाधीशांनी कायदेशीर बाबींच्या आधारावर केवळ न्याय्य निर्णय देतो. उलट कोणी पुढारी चुकला तर त्याच्यावर कारवाईचा अधिकार आम्हाला असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायाधीश बनण्यासाठी कोणती परीक्षा द्यावी लागते? असा प्रश्न वीरा भारुकाने विचारला. यात वकीलीचा अभ्यासक्रम केल्यानंतर न्यायाधीश होण्यासाठी स्वतंत्र परीक्षा होते, असे न्यायाधीशांनी सांगितले. तर नेतल अग्रवाल हिने एखाद्या केसचा निकाल लागायला किती वेळ लागतो? असे विचारले त्यावर केसचे महत्त्व व तिचा पाठपुरावा कसा होतो? यावर निकालाचा वेळ ठरतो, असे न्यायाधीशांनी सांगितले. तर ईश्वरी सूर्यवंशीने लिगल एड म्हणजे काय? याची विचारणा केली. त्यावर कोणी गरीब असेल तर त्याला निशुल्क वकील पुरवला जातो, मात्र तो त्यांच्या मनाप्रमाणे दिला जात नाही, असे स्पष्ट केले. केस ट्रायलमध्ये कशी जाते? अशी विचारणा केल्यावर पोलिसांकडून आलेले दोषारोप व त्यावर अभ्यास करून केस ट्रायलला जाते, असे न्यायाधीशांनी स्पष्ट केले.

या वेळी दिलीप बांगर, जोसेफ सरांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे शिक्षक नितीन शिंदे, संदिप, पायल सोनी ह्यांनी पूर्ण कार्यक्रम व्यवस्थीत नियोजन करून पार पाडला.

# सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीकडेच वर्गणी द्यावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ फेब्रुवारी**

हिंगोली येथे होणाऱ्या ऐतिहासिक सार्वजनिक शिवजयंती महोत्सवासाठी काहीजण परस्पर पैसे मागून दलाली करत असल्याचा प्रकार समोर आला आहे. शिवजयंती महोत्सवाच्या नावाखाली कोणाकडूनही जबरदस्तीने वर्गणी, तसंच आर्थिक मदत मागत असेल तर ते देऊ नये, फक्त अधिकृत शिवजयंती महोत्सव समितीकडेच वर्गणी द्यावी असं आवाहन समितीने एका पत्राद्वारे दिले आहेत.

शिवजयंती उत्सवाच्या आयोजनासाठी संपूर्ण शहरातील कार्यकर्ते आणि नागरिक मेहनत घेत आहेत. मात्र काही व्यक्ती शिवजयंती महोत्सवाचे नाव वापरून स्वतःची तुंबडी भरण्यासाठी दलाली केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. कोणत्याही प्रकारची पावती दिल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नयेत, असे आवाहन आता शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. शिवजयंती उत्सव हा सर्वसामान्यांचा सण असून तो पारदर्शक आणि लोकसहभागातून साजरा व्हावा, यासाठी समिती कटिबद्ध असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्षा सुनीता मुळे, सचिव रजनी पाटील, कार्याध्यक्ष स्वाती भोयर व कोषाध्यक्ष कांताबाई कल्याणकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावर्षी सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे नेतृत्व महिलांच्या हाती देण्यात आले आहे.

# संविधान प्रश्न मंजुषामधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ५ फेब्रुवारी**



संविधानाची जाण समृद्ध राष्ट्र निर्माण करते या प्रेरणादायी विचारातून यशवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, शिरड शहापूर यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित भारतीय संविधान विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल जाहीर करून जि.प. शाळा शिरला येथे पात्र विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक सुरज नारायण ठोंबरे, द्वितीय क्रमांक भाग्यश्री गोविंद कुऱ्हे, तर तृतीय क्रमांक खुशी संजय ढेंबरे यांनी मिळवला. विजेत्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच स्पर्धेत सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.यावेळी संस्थेच्या वतीने शाळेस भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली.

कार्यक्रमास यशवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिल कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक बनसोडे, शिरला येथील सरपंच नवनाथ कुऱ्हे, माऊली कुऱ्हे, संजय ढेंबरे, पाटील, नांगरे, जाधव यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

# औंढा नागनाथ येथे कार्यकर्त्यांनी घेतले दिवंगत नेते अजित पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ फेब्रुवारी**



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अस्थीकलश औंढा नागनाथ शहरात मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजता दाखल झाला. दिवंगत अजित पवार यांचे अस्थीकलश औंढा नागनाथ येथील शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात दर्शन घेण्याकरिता ठेवण्यात आले होते. यावेळी अस्थिकलशाचे कार्यकर्त्यांनी दर्शन घेत असताना अश्रू अनावर झाले होते.

यानंतर राष्ट्रवादी कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या अस्थिकलशाचे दर्शन घेतले व दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अजितदादा पवार...! अमर रहे च्या घोषणा देण्यात आल्या. दर्शनानंतर अस्थीकलश वाहनाद्वारे हिंगोलीकडे नेण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बि.डी बांगर,औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष संजय दराडे, युवक जिल्हाध्यक्ष आदित्य आहेर, माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब गायकवाड, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख, प्रवीण टोम्पे, गोपाळ मगर, विजय लखूसिंग राठोड, माऊली ढोबळे, राजू गरड, माऊली बोंगाने, गजानन सांगळे, सुभाष कावरे, विलास आघाव, भैया गायकवाड, अजहर इनामदार, माधव शिंदे, सुभाष सांगळे, दादाराव सांगळे, मुंजा रणमाळ, रामेश्वर चिलगर, बाबुराव गायकवाड, सागर घनसावंत, मिलिंद ननावरे, मुंजा रणमाळ, गजानन रणमाळ, अनंत सांगळे, गणेश डुकरे, गजानन शेळके, माधव शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# ग्रामीण शेत -शिवारात आंबा मोहरला

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ५ फेब्रूवारी-**

बिलोली तालुक्यातील आदमपूर परिसरातील काही भागात,शेत शिवारात किंवा बांधावर तुरळक असणाऱ्या आंब्याच्या झाडांना मागच्या कडाक्याच्या थंडीत तुडुंब मोहोर लगडलेला दिसून आला आहे. आंब्याला आलेला मोहोर पाहता यंदा गावरानी आंब्याची रसाळी चव शेतकरी तथा सर्वसामान्य नागरिकांना चाखायला मिळेल असे दिसते आहे.यंदा वर्षातील आम्रवृक्ष मोहोराची ही सुरूवात अंतर्गत मन उधाणत राहते.

अविट गोडीसाठी प्रसिद्ध असलेल्या गावरानी आंब्याची झाडे,आमराया, वरचेवर आता दुर्मिळ होत चालल्या आहेत.काही भागात नगण्य आंबा बागायतदार अजुनही आहेत.मागच्या वर्षात वादळी वारे व अवकाळी पावसाच्या तडाख्यात गावरानी आंब्यास प्रचंड फटका बसलेला होता.यावर्षी फुलोरा झाडांना अगदी लदबदून गेला आहे.

काही जुन्या जानत्या शेतकऱ्यांकडून खेडोपाडी गावरानी आंब्याची झाडे आजही राखून ठेवलेली नक्कीच आहेत.



आंबा मोहोरला की वातावरणात एक आगळावेगळा सुवासिक गंध अगदी धुंद दरवळत राहतो.मोहोर आणि घनगर्द सावली पाहता कौटुंबिक स्त्रीमन माहेरी जाऊन सलामी देत असते.कैरी आणि पाड लगडल्यावर उनाड पोरांचे टोळके रानोरानी भटकंती करीत निघतात. आंबा हंगामात घरीदारी पाहुण्यांची ये-जा हमखास वाढलेली असते.कौटुंबिक नवीन नात्यांची नाजूक गुंफण घरादारांत बांधलेली असते.

आदमपूर,बिलोली,देगलूर परिसरातील काही नर्सरीतला आंबा चाखायला बाजारात येतो,मात्र,त्याची चव गावरानी फक्कड आंब्यासमोर फिकी पडलेली दिसून येते.विविध गावराणी आंब्याचे वाण बाजारात उपलब्ध होतात. त्यामुळेच कौटुंबिक रसाळी किंवा चव चाखण्यासाठी सर्वसामान्य लोक गावरानी आंब्याची बाजारात मागणी दरसाल करीत असतात.मोहरलेला हा आम्रवृक्ष पाहून खव्वयांच्या तोंडाला आतापासूनच पाणी सुटू लागले आहे.वादळी वारे,पाऊस न लागता वातावरण पोषक राहीले तर आंबे खाणाऱ्यांची यंदा सुग्गी होईल, अशी परिसरातील शेतकऱ्यांकडून आशा व्यक्त केली जात आहे.

# कारागिरांच्या व्यवसायवृध्दीसाठी प्रदर्शन व विक्री उपक्रम महत्वाचे :आयुक्त डॉ. डोईफोडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

कारागिरांच्या पारंपरिक व्यवसायाला मदत करणे हा पीएम विश्वकर्मा योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत नोंदणी केलेल्या कारागिरांना विविध स्वरूपाचे लाभ उपलब्ध करून देण्यात येतात. कारागिरांच्या व्यवसायवृद्धीसाठी अशा प्रदर्शन व विक्री उपक्रमांना महत्त्व असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले.

आज लोकमान्य मंगल कार्यालय, अण्णाभाऊ साठे चौक, सम्राट नगर, नांदेड येथे एमएसएमई विकास कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच खादी ग्रामोद्योग मंडळ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत भव्य प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाचे उदघाटन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे सहाय्यक संचालक राहुलकुमार मिश्रा, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय सारंगधर यांच्यासह जिल्हा उद्योग केंद्र, कौशल्य विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हा कार्यक्रम ५ व ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुला राहणार आहे. या प्रदर्शनात पारंपरिक कारागीर व शिल्पकारांना त्यांच्या कौशल्याचे सादरीकरण व थेट विक्री करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये सुतार, अस्त्रनिर्माते, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई व झाडू निर्माते, पारंपरिक बाहुली व खेळणी निर्माते, मालाकार आदी विविध व्यवसायांतील विश्वकर्मा बांधव सहभागी झाले आहेत.

जिल्ह्यात आतापर्यंत पीएम विश्वकर्मा योजनेत १ लाख ३३ हजार २५७ कारागिरांनी नोंदणी केली असून, यापैकी ४ हजार ८७४ कारागिरांना कर्ज मंजूर झाले असून यापैकी ४ हजार १०२ कारागिरांना कर्ज वाटप झाले आहे. तर ७ हजार ५९४ कारागिरांना टुलकिट वाटप करण्यात आले आहे अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी संजय सारंगधर यांनी दिली. तसेच या प्रदर्शनीत ५० कारागिरांनी सहभाग नोंदविला असून विविध व्यवसायांतील विश्वकर्मा बांधवानी स्टॉल लावले आहेत. नागरिकांनी या प्रदर्शन व विक्रीचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## गझलकार मानेमोड यांना राज्यस्तरीय ‘गावगाडा’ गझल साहित्य पुरस्कार

**नायगाव/नरसी -** मराठी गझल क्षेत्रात आपली आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे नरसी येथील गझलकार मारोती मानेमोड उर्फ राया यांना



विश्वकर्मा तरुण मंडळ, वडशिवणे (ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्या वतीने दिला जाणारा स्व. सतीश दराडे राज्यस्तरीय ‘गावगाडा’ गझल साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. अनोख्या खयालांची मांडणी, साधी पण आशय पूर्ण शब्दरचना आणि सामान्य माणसाच्या भाव भावनांना भिडणारी गझल ही मानेमोड यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. सध्या ते विदर्भात शिक्षकी पेशात कार्यरत असून, शिक्षण सेवेबरोबरच मराठी गझल क्षेत्रात सातत्यपूर्ण व दर्जेदार लेखन करत आहेत. त्यांचा पहिलाच गझलसंग्रह ‘निर्गुणी आकार’ वाचक आणि साहित्य वर्तुळात विशेष चर्चेत राहिला आहे. या संग्रहातील हृदयस्पर्शी व मर्मभेदी गझलांनी अनेक पुरस्कार मिळवले असून, संपूर्ण महाराष्ट्रभर या संग्रहाने लोकप्रियतेचा ठसा उमटवला आहे. या पुरस्कारामुळे मानेमोड यांच्या साहित्यिक वाटचालीत आणखी एका मानाच्या सन्मानाची भर पडली आहे. पुरस्काराची घोषणा मंडळाचे अध्यक्ष सोमनाथ टकले व संयोजक समितीने केली आहे. या यशाबद्दल नरसी परिसरासह साहित्यविश्वातून मारोती मानेमोड यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## प्रियंका सूर्यतळे- बावस्कर यांची तंत्रज्ञ पदावर नियुक्ती

**नांदेड -** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नुकतेच तीन वर्षाचा



कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्या विद्युत सहाय्यकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले असून यात प्रियंका सूर्यतळे -बावस्कर यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश काढले असून या आदेशात तीन वर्षे कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्या पाच विद्युत सहायकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले आहे. यात प्रियंका सूर्यतळे -बावस्कर यांचा समावेश असून त्यांना संचलन व सुव्यवस्था उपविभाग २ नांदेड या ठिकाणी तंत्रज्ञ पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये कायम झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## नांदेड ते निजामबाद दरम्यान पुष पुल रेल्वे सेवा सुरू करा : पत्रकार संघ

**मुदखेड, दि. ५ फेब्रूवारी-** नांदेड ते निजामाबाद दरम्यान रेल्वे पुष पुल रेल्वे सेवा सुरु करण्यात यावी या संबंधी आज दि.५ फेब्रुवारी रोजी मुदखेड रेल्वे स्दटेशन येथे दक्षिण मध्य रेल्वे झोन सिकंदराबादचे



महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव यांची भेट घेत मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद झोन चे महाव्यवस्थापक संजय कुमार श्रीवास्तव यांचं वार्षिक परीक्षण या हेतूने दक्षिण मध्य रेल्वे झोन मध्ये येणारे सर्व रेल्वे स्थानकांची पाहणी करत सुरू असलेल्या विकास कामांची माहिती घेत आज मुदखेड रेल्वे स्टेशनवर अमृत भारत योजनेत अंतर्गत मुदखेड रेल्वे स्टेशन पुनर्विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकास कामांची माहिती घेतली यावेळी मराठी तालुका पत्रकार संघाच्या वतीने निवेदन स्वीकारले नांदेड पासून निजामाबाद दरम्यान सकाळी ९:०० नंतर देवगिरी एक्सप्रेस नंतर कोणतीच रेल्वे सेवा नसल्यामुळे या भागातील नागरिकांची खूपच प्रवास करण्यासाठी खूपच दमछाक होते त्यांना प्रवास करण्यासाठी एसटी किंवा खाजगी वाहतुकीनेच प्रवास करावा लागतो ती तात्काळ दूर करत नांदेड ते निजामाबाद दरम्यान पुषपुल सेवा रेल्वे सुरू करून होणारी गैरसोय दूर करून नागरिकांना रेल्वेची सेवा उपलब्ध करून द्यावी असे या निवेदनात प्रमुख मागणी केली आहे. याप्रसंगी तालुका अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, तालुका कार्याध्यक्ष दिनेश शर्मा, शहराध्यक्ष अतिक अहमद, शेख शमशोद्दीन, आणि मोहम्मद हकीम यांची उपस्थिती होती.

# आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची आश्वासनपूर्ती

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ५ फेब्रूवारी-**

नगर पालिका क्षेत्रात असलेले क्रिडा संकुलात सैन्य भरतीचा सराव करणाऱ्या तरुणांना भौतीक सुविधा पुरविण्यात येणार असे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी क्रिडा संकुलाची पाहाणी करुन सराव करणाऱ्या तरुणाना विश्वास दिला

या मैदानावर पोलीस व सैन्य भरतीचा सराव करणाऱ्यांना तरुण-तरुणीना धावण्यासाठी तात्काळ ट्रॅक तयार करून देण्यात येणार आहे.या ठिकाणावरील जीममध्ये नविन व्यवस्था करुन त्यामध्ये साहित्य ठेवण्यासाठी सोया करण्यात येणार आहे.अशा सूचना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यानी सार्वजनिक बांधकाम विभाग व क्रीडा अधिकारी यांना दिल्या आहेत.

तालुका क्रीडा संकुलाचे पाहणी करताना आ चिखलीकर यांच्या सोबत नगराध्यक्ष शरद पवार बांधकाम -विभागाचे उपअभियंता नरमिटवार तालुका क्रीडा अधिकारी, राहून श्रीरामवार, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी कृउबा सभापती बाबुराव केंद्रे गटनेते भास्कर पवार , नगरसेवक अविनाश पवार,पंकज परिहार,



तुकाराम दाढेल , इरबाजी पवार क्रीडा तज्ज्ञ बी डी- जाधव, अभियंता सोमवंशी, शहर प्रमुख खंडू पवार यांसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित्र होते.

क्रीडा संकुलात सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींसाठी धावण्याचा ट्रॅक , गोळा फेक, लांब उड्डी व शारीरिक चाचणी क्षमतासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा देण्यात येणार आहेत . ४ फेब्रुवारी रोजी आ. . प्रताप पाटील चिखलीकर यांनी बेरळी रोड लगत लोहा तालुका क्रीडा संकुलाला भेट दिली तेथील दुरावस्था, वाढलेले गवत पाहून तालुका. अधिकारी यांना त्यांनी झापले. तसेच तेथे सैन्य व पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या युवक युवतीशी त्यांनी संवाद साधला. आपल्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

संबंधितांना तात्काळ सुचना देत आठ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांसाठी धावण्याचा ट्रॅक तयार करावा इमारत परिसर स्वच्छता, रंगरंगोटी करावी तसेच या विद्यार्थ्यांना हॉल उपलब्ध देण्याच्या सूचना तसेच इमारत देखभाल साठीची व्यवस्था कसरण्याचे निर्देश दिले. सुनेगाव परिसरात सामाजिक वनीकरणाच्या जागेवर एखादा ट्रक तात्पुरता तयार करुन त्या भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय व अडचण दूर होईल याची चाचपणी सुरू आहे.

# भू-विकास बँकेच्या ५ हजार १०६ कर्जदार शेतकऱ्यांचे कर्ज माफ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

नांदेड जिल्ह्यातील भू-विकास बँकेच्या एकुण ५ हजार १०६ कर्जदार शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील भू-विकास बँकेच्या कर्ज बोजाची नोंद कमी करण्याबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नुकतेच २ फेब्रुवारी रोजी परिपत्रक निर्गमीत केले आहे. त्यानुसार जिल्हयातील संबंधित सर्व तहसिलदार यांना तालुक्यातील एकुण ५ हजार १०६ थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी देऊन सदर शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील भूविकास बँकेच्या (भु-तारण बँक, भूविकास बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण विकास बँक मर्या. मुंबई) कर्जबोजाची नोंद कमी करण्याबाबत तसेच यासाठी सर्व तालुक्यानी मंडळस्तरावर कॅम्प आयोजित करावीत व कर्ज बोजाची नोंद कमी केल्याचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नांदेड जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय बँक (भू-विकास बँक ) नांदेड या बँकेची दिनांक ८ मार्च २०२५ रोजीच्या आदेशान्वये नोंदणी रद्द झाली असुन महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय एलडीबी १०१५/ प्र.क्र. २८ ( शिकाना / ७-स) दिनांक ९ नोव्हेंबर २०२२ अन्वये राज्यातील सर्व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. मुंबई (शिखर भूविकास बँक) व जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकाचे (जिल्हा भूविकास बँका) कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज पुर्णतः माफ झाले आहेत.

भु-तारण बँक, भूविकास बँक व महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण विकास बँक मर्या., मुंबई या बँकेचे सभासद असलेल्या शेतकऱ्यांनी नोंद कमी केल्याची खात्री करावी असे आवाहन केले.

# कलियुगामाजी करावें कीर्तन । तेणें नारायण देईल भेटी ।। या सद्भावनेने पैनगंगेच्या तीरावरील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता.

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ५ फेब्रूवारी-**

तालुक्यातील टाकळी गावच्या चोलेवाडी येथे लगतच्या पैनगंगेच्या तीरावरती गेल्या बारा वर्षापासून सतत सुरू असलेल्या हरीनाम सप्ताहाची सांगता

कलियुगामाजी करावें कीर्तन ।
तेणें नारायण देईल भेटी ।।

या सद्भावनेने ह. भ. प. शिवा महाराज यांच्या कल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

हरी नामाचा गजर हरिनामाचा काठी डाव मांडिला, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल’ अशा विठूरायाच्या गजरात चोले वाडी टाकळी गावात हनुमान मंदिरा पासून दिंडी काढून हरीनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने हरिनामाचा गजर करण्यात आला गावात घरो घरी रांगोळी सडा टाकून दिंडीचे स्वागत केले सात दिवसात सुरु असलेल्या पारायण, भागवत, हरिपाठ, भारूड, महाप्रसाद आणि रात्रीला कीर्तनाचा कार्यक्रम तसेच धार्मिक कार्यक्रमांमुळे पैंणगंगे काठावर जणू पंढरपुरासारखे वातावरण पाहायला मिळाले.या सोहळ्यात अनेक दानशूर व्यक्तीं यांच्या कडून महाप्रसाद देऊन विशेष सहकार्य केले तसेच या कीर्तन सोहळ्यात पारायण ह. भ. प.विलास महाराज टाकळीकर आणि भागवत ह. भ. प. शिवा बापू महाराज यांच्या मधुर वाणीतून भागवत कथा पार पडली. या अखंड हरिनाम सप्ताह विशेष म्हणजे चिमुकल्याने हरिपाठ करून उपस्थिताची मनं जिंकली.

यावेळी कीर्तन सोहळ्यात उपदेश करताना भावी



पिढीतला माणूस घडवण्यासाठी अशा सोहळ्याचे आयोजन करणे काळाची गरज असल्याची भावना ह. भ.प. निवृत्ती महाराज चाटे यांनी आपल्या कीर्तनातून व्यक्त केली.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खऱ्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खऱ्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं.

संत बहिणाबाई आपल्या या अभंगात वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ कशा पद्धतीने रोवली गेली याची माहिती देतात. बाराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी या भूमीत वारकरी संप्रदायाचा पाया रचला. आणि तुकोबारायांनी त्यावर कळस चढवायच काम केलं.

नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग। जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग।।

पहिले कीर्तनकार म्हणून संत नामदेव महाराज यांनी या परंपरेला सुरुवात केली. यावेळी ज्ञानोबाराय टाळकरी म्हणून तर गोरोबा काका पखवाज वाजवून नामदेवरायांना साथ द्यायचे. यावेळी चंद्रभागेच्या वाळवंटात ही कीर्तनं पार पडायची. इथूनच खऱ्या अर्थाने वारकरी कीर्तन परंपरेला प्रारंभ झाला आणि ही परंपरा आजतागायत सुरू आहे.

कालांतराने सात दिवसाचे पारायण सामूहिकरित्या सर्वांनी एकत्र येऊन पार पडू लागले. यातूनच सात दिवसाचा ‘अखंड हरिनाम सप्ताह’ खऱ्या अर्थाने सुरू झाला. सप्ताह म्हणजे वारकरी संप्रदायाची उपासना आहे. या सात दिवसात संतांचे अखंड नामचिंतन करण्यात येते.

पहाटे काकडा आरती. त्यानंतर ज्ञानेश्वरी किंवा गाथ्याचे सामुदायिक पारायण. दुपारी प्रवचन. संध्याकाळी हरिपाठ आणि रात्री हरिजागरण म्हणजेच कीर्तन, असा साधारण हरिनाम सप्ताहाचा दिनक्रम.

महाराष्ट्रात शेकडो वर्षांची परंपरा असलेले अखंड हरिनाम सप्ताह आजतागायत चालू आहेत. हिच परंपरा माहूर तालुक्यातील टाकळी गावच्या चोलेवाडी येथे गेल्या बारा वर्षांपासून सतत लगतच्या पैनगंगेच्या तीरावरती अखंडपणे सुरू आहे.

याठिकाणी सुरू असलेल्या सप्ताहात आघाताप्रमाणे पहिल्या दिवसाचे कीर्तन हे नामपर म्हणजे नाम महात्म्य सांगून देवाच्या स्वरुपाच वर्णन करणारं. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी संत महात्म्य म्हणजेच संतांच चरित्र सांगितलं गेलं. चौथ्या आणि पाचव्या दिवशी भक्तीपर. सहाव्या दिवशी वेदांताचे अभंग यावर तर सातव्या दिवसाचे मागणीपर आणि आठव्या म्हणजेच शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन केले गेले.

टाकळीच्या चोलेवाडी येथील पैनगंगेच्या तीरावरती आयोजित हरिनाम सप्ताहात गावातील सर्वच ग्रामस्थ, विविध संस्थांच्या वतीने सप्ताहाचा नियोजन करण्यात आले. आजूबाजूच्या गावातील लोकांना देखील यावेळी सप्ताहाच आमंत्रण दिलं गेलं. यातून गाव परिसरातील सर्व टाळकरी, माळकरी, भाविक, भजनी मंडळ यांनी एकत्र येऊन हा सप्ताह साजरा केला.रोजच्या कीर्तनाला टाळकरी, पखवाज वादक, पेटी वादक, गायक, विनाधारी असे सर्वजण पांढऱ्या शुभ्र कपड्यात हजर होते. डोक्यावर टोपी, खांद्यावर उपरणे, गळ्यात टाळ, कपाळावर बुक्का असा एकंदरीत पेहराव होता.

विनाधारी महाराजांकडे विना देण्यात आली आणि एकमेकांच्या पाया पडत ‘राम कृष्ण हरी’ भजनाने रात्रीच्या कीर्तनाला सुरुवात केली गेली.

हा अभंग झाल्यावर विठोबा रखुमाई भजन सुरुवात तर शेवटी ‘जय विठ्ठल जय हरी विठ्ठल’ भजन होऊन कीर्तनाची सांगता होत होती.

अशा पद्धतीने सात दिवसाच्या सप्ताहात विविध महाराजांची कीर्तन झालीत. सप्ताहाचा शेवट काल्याच्या कीर्तनाने झाला. श्रीकृष्णाच्या जीवनातील महत्वाच्या प्रसंगांची माहिती यावेळी सांगितली गेली. यावेळी साधारण शेवटच्याच दिवसाचे कीर्तनकारांनी मुक्कामी थांबून दुसऱ्या दिवशी सकाळी काल्याचे कीर्तन केले. हे कीर्तन सकाळी साधारण दहाला सुरू झाले. या कीर्तनात कृष्णाच्या विविध लीला सांगणाऱ्या गौळणी म्हटल्या गेल्या. शेवटी दह्याच्या प्रसादाचं मडकं फोडून काला साजरा केला गेला. दुपारी सर्व ग्रामस्थांसाठी महाप्रसाद दिला गेला. यावेळी सप्ताहासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिलं अशा मंडळींचे आयोजकांच्या वतीने आभार मानून सप्ताहाची सांगता करण्यात आली.

# नांदेडमध्ये दुग्ध व्यवसायवाढीला गती मिळणार; खा.डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रस्तावाला केंद्राचा हिरवा कंदील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ फेब्रूवारी-**

नांदेडमध्ये दुग्ध व्यवसायवाढीला केंद्राने हिरवा कंदील दाखवला असून जिल्ह्यातील दुग्धव्यवसायाची मोठी क्षमता लक्षात घेता, दुग्ध उत्पादन वाढीसाठी केंद्र सरकारकडून ठोस पावले उचलण्यात येत असल्याची ग्वाही केंद्रीय दुग्धविकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांना राज्यसभेत दिली.

राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी नांदेडसह मराठवाड्यातील दुग्धविकासाबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना मंत्री राजीव रंजन सिंह यांनी त्यांचे प्रथम अभिनंदन केले व या प्रश्नामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर वाचा मिळाल्याचे नमूद केले.

मंत्री राजीव रंजन सिंह यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारांच्या समन्वयातून भारत आज जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश बनला आहे. ज्या भागांमध्ये दुग्ध उत्पादनाची नैसर्गिक क्षमता आहे, त्या भागांमध्ये केंद्र सरकार विशेष प्रयत्न




करून दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन देत आहे.याच अनुषंगाने मराठवाडा व विदर्भ विभागासाठी दि. १६ मार्च २०२५ पासून एन.डी.डी.बी. मार्फत, राज्य सरकारच्या सहकार्याने ‘विदर्भ-मराठवाडा डेअरी विकास परियोजना’ ही अभिनव योजना सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.नांदेड जिल्ह्याबाबत माहिती देताना मंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, सध्या जिल्ह्यात सुमारे १९.६ हजार लिटर दैनंदिन दूध उत्पादन होत असून, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन मार्च २०२६ पर्यंत प्रतिदिन २५ हजार लिटर दूध उत्पादन करण्याचे लक्ष्य केंद्र - राज्य सरकारने संयुक्तपणे निश्चित केले आहे. मराठवाड्यातील दुग्धविकासाच्या पायाभूत सुविधांचा आढावा देताना त्यांनी सांगितले की, सध्या १५ बल्क मिल्क कुलर व एक मिल्क चिलिंग प्लांट कार्यरत आहेत.

देशातील दुग्धव्यवसायाची सद्यस्थिती स्पष्ट करताना मंत्री महोदयांनी नमूद केले की, जरी भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश असला, तरी सुमारे ६३ टक्के दूध उत्पादक असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत, तर केवळ ३७ टक्के क्षेत्र संघटित स्वरूपात आहे. असंघटित क्षेत्राचे संघटित क्षेत्रात रूपांतर करणे अत्यावश्यक असून, यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना दूध उत्पादनाचा योग्य दर आणि थेट आर्थिक लाभ मिळेल, असे त्यांनी अधोरेखित केले.देशी वंशाच्या गाईंची संख्या वाढवण्यासाठी कृत्रिम गर्भधारणेची सुविधा शेतकऱ्यांच्या थेट दारापर्यंत पोहोचवली जात असल्याचेही मंत्री महोदयांनी सांगितले. या तंत्रज्ञानामध्ये सुमारे ९० टक्के गायींचा जन्म सुनिश्चित होईल, अशा पद्धतीचा वापर केला जात असून, त्यामुळे मोकाट जनावरांची समस्या निर्माण होणार नाही, याचीही काळजी घेतली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे नांदेडसह संपूर्ण मराठवाड्यातील दुग्धव्यवसायाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, केंद्र सरकारच्या सकारात्मक भूमिकेमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विश्वात्मक सूर

विश्वाच्या पाठीवर सदा सर्वकाळ कुठे ना कुठेतरी लतादीदींचा स्वर्गीय सर उमटत राहतो, निनादत राहतो... आणि त्यामुळेच लतादीदी अमर आहेत. त्यांचा दैवीय स्वर हा त्यांच्या अस्तित्वाची सदैव साक्ष देत राहील. देव, देश आणि धर्मासाठी त्या जगल्या आणि सातत्याने तीस वर्षे याची अनुभूती एक स्वामी भक्त म्हणून मी घेऊ शकलो.

'देव' म्हणून त्यांच्या आयुष्यामध्ये मंगेशी देवी नंतर स्वामींचे अनन्यसाधारण महत्त्व होते.

'देशा' साठी - स्वदेशासाठी प्राण देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल त्यांची असीम निष्ठा होती आणि 'राष्ट्र' धर्म ज्यांनी जागवला त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत देखील त्यांच्या भाव विश्वात एक अनन्यसाधारण महत्त्व होते.

श्री स्वामी आणि अक्कलकोट हे त्यांच्या विशेष श्रद्धेचे विषय होते. त्याच माध्यमातून त्यांच्याशी सूर जुळले. केवळ परंपरा म्हणून नव्हे तर एक स्वामी सेवक म्हणून अक्कलकोट मध्ये येणाऱ्या प्रत्येक भुकेलेल्या व्यक्तीला अन्न आणि भाविकाला छत्र देण्याची अन्नछत्र मंडळाची संकल्पना त्यांना खूप भावली आणि त्यातून त्यांनी स्वामी चरणी आपल्या वैभवातील काही मोती दान केले.

गेली तीस वर्षे या स्नेहमयी माऊलीच्या सहवासामध्ये वावरण्याचा आणि त्याची अनुभूती घेण्याचे सुवर्णमयी पर्व मी अनुभव शकलो.

छत्रपती शिवाजी महाराज हे त्यांचे आणि माझे सामायिक अधिष्ठान ! त्यामुळे हे सूर अधिकच घट्ट झाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांची प्रखर देशभक्ती त्यांच्यामध्ये उतरली होती. स्वामीनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, सूरनिष्ठा या त्रायींचा संगम दीदींच्या ठाई होता. अक्कलकोट मध्ये सुरू असलेले कोट्यावधी रुपयांचे प्रकल्प आणि त्यातून स्वामी भक्तांना मिळणाऱ्या सुविधा हा नेहमीच त्यांच्या करिता अत्यंत संवेदनेचा विषय राहिला. त्यासाठी त्यांनी भरपूर सहकार्य देखील केले आणि आमच्या विचारांना नवी दिशा दिली.

आजही मंगेशकर कुटुंबियांनी मला अंतर दिले नाही.. आजही उषा दीदी, मीना दीदी, पंडित जी आणि सर्वच मंगेशकर कौटुंबीय यांच्या अतिव सद्भावनेतून, प्रेमातून त्यांनी अक्कलकोट शी आणि स्वामी भक्तांची असलेला संवाद कायम ठेवला आणि याच माध्यमातून लतादीदींच्या इच्छेचा, भावनेचा, स्वप्नांचा अखंड जागृत यज्ञ सुरू राहिला आहे अशी माझी भावना आहे.

महाराष्ट्राला त्या गाणं कोकिळा म्हणून परिचित असतील परंतु स्वामी भक्तांसाठी त्या एक दानशूर कर्तृत्व म्हणून परिचित आहेत. सरस्वतीच्या दरबारातील हे माणिक अखंड हिंदुस्तान च्या शिरावर शोभून दिसत होते मात्र ते विश्व तेजाचे ही समर्पक द्योतक होते. भारत आणि सीमा रेषेवरील राष्ट्र सीमा आपल्या प्रेमामयी स्वरांनी एकत्रित करून विश्वाला गवसणी घातली आणि वसुधैव कुटुम्बकम चा संस्कार जगासमोर ठेवला. आजही प्रत्येक कंठस्थ आराधनेमध्ये लतादीदी जिवंत आहेत.

आज या निमित्ताने लता वैद्यक पुरस्कार देण्याची एक अत्यंत चांगली संकल्पना साकारली जात आहे.. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात त्यांनी शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये फार मोठे समर्पण दिले. एमआयटीच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतीत सप्तसुरांचे विश्वविद्यालय उभा राहिले तर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णसेवेचा एक महायज्ञ सुरू झाला.

आशिर्वाद



भारतरत्न गानसम्राज्ञी आदरणीय लतादिदि मंगेशकर

दक्षिणेमध्ये जन्मलेले परंतु जगभरात आपल्या वैद्यक विज्ञान विद्वत्तेने विख्यात झालेले एस. राजशेखरन यांना हा पुरस्कार दिला जात आहे आणि याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटीचे विश्वनाथ कराड हे आहेत हा एक अपूर्व योगायोग आहे.

दीदींनी जी दोन उदात्त स्वप्ने पहिली त्यांना साकारणारे हे दोन महान दूत खऱ्या अर्थाने त्या देवीचे स्वप्न पूर्ण करीत आहेत.

अशा या कार्यक्रमाला मला उपस्थित राहण्याचा मिळालेला सन्मान हा देखील मी मोलाचा समजतो. हा माझा व्यक्तिशः सन्मान नाही तर सगळ्या स्वामी भक्तांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपाचा बहुमान मी मानतो.

दीदीचा स्वर अमर आहेच तथापि त्यांच्या स्वप्नांच्या परिघावर असलेल्या या संस्था आणि संस्थांच्या माध्यमातून दिले जाणारे पुरस्कार आणि त्यातून समाजाला मिळणारी प्रेरणा ही अशीच अखंडित प्रवाहित राहो हीच स्वामी चरणी प्रार्थना !

**श्री.जन्मेजयराजे विजयसिंह राजे भोसले**
संस्थापक अध्यक्ष : अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट
**(शब्दांकन : अनिरुद्ध बडवे)**

## जागतिक कर्करोग दिनानिमित्त
# महाराष्ट्रभर सायकल फॉर गोल्ड उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०५ फेब्रुवारी :** जागतिक कर्करोग दिन (४ फेब्रुवारी २०२६) निमित्त कॅनकिड्स किड्सकॅन या राष्ट्रीय संस्थेने, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सहयोगाने, राज्यव्यापी सायकल फॉर गोल्ड (उपक्रम) उपक्रमाचा पाचवा टप्पा कार्यान्वित केला. देशातील सर्वात मोठ्या धर्मादाय सायकलिंग मोहिमांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या उपक्रमाचा फोकस फिटनेस, जनजागृती आणि निधी संकलन या त्रिसूत्रीवर आहे.

### संभाजीनगरात उत्स्फूर्त प्रतिसाद

तंदुरुस्त राहा. आशा द्या. या संदेशासह हनुमान टेकडी ते बीबी का मकबरा मार्गावर झालेल्या रॅलीत १०० हून अधिक विद्यार्थी, १२ व्यावसायिक सायकलस्वार आणि कॅनकिड्स टीमचे १० सदस्य सहभागी झाले. महानगरपालिका शाळा, बेगमपुरा येथील ५० विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

प्रधान सचिव रणजीत सिंह देओल (आयएएस) यांनी उपक्रमाला संस्थात्मक पाठबळ देत शारीरिक व मानसिक आरोग्याबरोबर सामाजिक जबाबदारीची जाणीव बळकट होत असल्याचे नमूद केले. कॅनकिड्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव दयाल यांनी ६ लाख किमी सायकलिंग व ३ कोटी रुपयांचे लक्ष्य जाहीर करत 'कॅनशाला' व राज्यस्तरीय आरोग्य सहकार्याचा उल्लेख केला.

डॉ. अरविंद गायकवाड व डॉ. विजय व्याव्हरे यांच्या हस्ते रॅलीला प्रारंभ झाला. बालकर्करोगाचे लवकर निदान, त्वरित उपचार आणि समग्र सहाय्य यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# स्कोडा कायलकचा ५०,००० विक्रीचा टप्पा



**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०५ फेब्रुवारी :** स्कोडा ऑटो इंडियाची सब-४ मीटर एसयूव्ही 'कायलक'ने ५०,००० विक्रीचा टप्पा ओलांडला. वाढत्या मागणीच्या पार्श्र्वभूमीवर मॉडेल लाइन-अप चारवरून सहा व्हेरिएंटपर्यंत विस्तारला असून ११ किंमत पर्याय उपलब्ध आहेत. नवीन 'क्लासिक प्लस'मुळे टॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक अधिक सुलभ झाले. इलेक्ट्रिक सनरूफ, क्रूझ कंट्रोल, ऑटो आयआरव्हीएम, रेन-सेन्सिंग वायपर्स, मल्टी-फंक्शन स्टीयरिंग, एलईडी लाईट्स यांसारखी वैशिष्ट्ये उपलब्ध. सिग्नेचर/सिग्नेचर प्लस अपग्रेड्स व 'प्रेस्टिज प्लस' टॉप व्हेरिएंट सादर. मर्यादित कालावधीसाठी वर्धापनदिन ऑफर्स, सर्व्हिस पॅकेजेस जाहीर. ब्रँड डायरेक्टर आशीष गुप्ता यांनी ग्राहकविश्र्वास व सेगमेंटमधील स्पर्धात्मक स्थान अधोरेखित केले.

## आरोग्यसेवेतील नवोपक्रमांची ९० वर्षे साजरी

**छत्रपती संभाजीनगर :** आरोग्यसेवेतील नवोपक्रमांची ९० वर्षे साजरी करत असतानाच, फुफ्फुसांच्या आरोग्याच्या निदानासाठी भारतातील पहिली समर्पित निदान सुविधा असणारे सिप्लाचे ब्रीदफ्री लंग वेलनेस सेंटर देशभरात लवकर आणि सुलभ श्र्वसन काळजी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने एक अग्रगण्य पाऊल आहे. डॉ. सुहास जे बर्दापुराकर, पल्मोनोलॉजिस्ट आणि ऍलर्जी तज्ज्ञ, औरंगाबाद म्हणाले, श्र्वसनविकार हा व्यक्तींच्या जीवनावर आणि आरोग्यसेवेवर प्रचंड ताण निर्माण करत असल्याने, त्याचे लवकर निदान, तपासणी होणे आणि उपचारांना प्राधान्य देणाऱ्या सर्वसमावेशक उपायांची तातडीची गरज आहे.


बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज, दाह, टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज व असहनीय वेदना इ. त्रास दूर करण्या करीता मदत करते.



अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.



वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co


# वारी-बारी परंपरेतून महाराष्ट्राची जडणघडण : डॉ. शेषराव पठाडे

**तभा वृत्तसेवा**
**छत्रपती संभाजीनगर, दि. ०५ फेब्रुवारी :** वारी आणि बारी या लोकपरंपरांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक डीएनएमध्ये लोकजागृती, समाजप्रबोधन आणि मूल्यसंवर्धनाची भक्कम पायाभरणी केली, असे प्रतिपादन शाहिरी वाङ्मय अभ्यासक तथा ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांनी ज्योतिर्मय आयोजित साहित्योत्सवात केले. सप्रयोग व्याख्यानात त्यांनी गण, अभंग आणि लावणींच्या माध्यमातून कीर्तन-तमाशा परंपरेतील अध्यात्मिक व सामाजिक आशय अधोरेखित केला. ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांचा मराठी मनावर अखंड प्रभाव असल्याचे नमूद करत लोककलावंतांनी लोकविवेक जागा ठेवला, असे ते म्हणाले. पेशवेकालीन शाहिरांनी शृंगाराबरोबरच अध्यात्मिक लावण्या लिहून प्रबोधन साधल्याचा त्यांनी उल्लेख केला. ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना मिळालेल्या पद्मश्री सन्मानामुळे लोककलेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.




कार्यक्रमास डॉ. वि. ल. धारूरकर, गायक दीपक गिरी, डॉ. मंगला वैष्णव उपस्थित होते. स्वागत संजय व्यापारी; परिचय व सूत्रसंचालन आनंद काळे यांनी केले.

### 'जाने अनजाने हम मिले'मध्ये सेहज राजपूतचे आव्हानात्मक दृश्य; 'हायवे'ची प्रेरणा

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील मालिकेत उन्नतीची भूमिका साकारणाऱ्या सेहज राजपूतने अलीकडेच शारीरिक अत्याचाराचे अत्यंत संवेदनशील दृश्य साकारले. पार्टीदरम्यान स्कॅमरच्या हल्ल्यानंतर उन्नतीच्या मानसिक आघाताचा प्रवास कथानकात दाखवला आहे. हे दृश्य चित्रीत करताना भावनिक ताण जाणवल्याचे सेहजने सांगितले. दिग्दर्शकांच्या सहकार्यामुळे प्रक्रिया सुलभ झाली, असे ती म्हणाली. अभिनयासाठी तिला आलिया भट्टच्या 'हायवे' चित्रपटातील प्रभावी प्रसंगातून प्रेरणा मिळाली. पुढील भागांत उन्नतीचे पॅनिक अटॅक आणि तिच्या पुनर्वसनात रीत व राघवचा आधार दाखवला जाणार. मालिका दररोज रात्री १०:३० वाजता प्रसारित होते.

# राज्यस्तर शालेय बेल्ट रेसलिंग स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्यातील विधार्थांनी मिळविले यश

**तभा वृत्तसेवा**
**बिडकीन, दि. ०५ फेब्रुवारी :** ता नेवासा जिल्हा अहिल्यनगर येथे राज्यस्तर शालेय बेल्ट रेसलिंग स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर जिल्यातील विध्यार्थींनी मिळविले यश या स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यनगर व क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या संयुक्त विधमाने बेल्ट रेसलिंग व मास रेसलिंग स्पर्धा संपन्न झाल्या.



विजयी विध्यार्थी यांचे नावे खालील प्रमाणे आहेत.

कु प्राची घोरपडे रोप्य पदक व विभागात प्रथम,कु अश्मिता राजूरकर रोप्य पदक व विभागत प्रथम, कु अनुश्री घुगे कास्य पदक व विभागात सुवर्ण पदक, कु तनश्री राठोड (विभागत प्रथम), कु, धनश्री वाघ सुवर्ण पदक ( विभागात प्रथम, कु यशोधन घुगे कास्य पदक व (विभागात सुवर्ण पदक), जय राठोड विभागात सुवर्ण पदक, कु. स्वप्नील राठोड रोप्य पदक, कु. पुर्थीराज राठोड विभागात सुवर्ण पदक, कु.वीरेंद्र राठोड विभागात सुवर्ण पदक, कु. संस्कार निंबाळे विभागात सुवर्ण इत्यादी विध्यार्थी यानी राज्यस्तर व विभागस्तर स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विविध वजन गटात प्रविण्य मिळविले या सर्व विद्यार्थ्यांना ट्रॅडिशनल बेल्ट रेसलिंग असोसिएशन छत्रपती संभाजीनगर संघटनेचे क्रीडा मार्गदर्शन पवन घुगे सचिव प्रविण घुगे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे.


सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क -७३८५५६७०३१


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७९/२०२६

अर्जदार :१) सुरेश लक्ष्मण तिनगोटे, वय ५६ वर्ष, व्यवसाय मजुरी,रा. पाईप लाईन जवळ, मुलुंद वेस्ट, मुंबई, पोस्ट भांडुप कॉम्पलेक्स, ता. जि. मुंबई २) हरीश लक्ष्मण तिनगोटे, वय ५० वर्ष, व्यवसाय मजुरी, रा. ३०४, सिध्दीविनायक, सी.एच.एस., एस.आर.ए जव्हेर रोड,पोस्ट मुलुंद वेस्ट, ता.कुर्ला, जि. मुंबई ३) कल्पना रवी भरगाव वय ४५ वर्ष, व्यवसाय घरकाम, रा. रमाबाई पाडा, पाईप लाईन, मुलुंद वेस्ट, मुंबई ४) रेखा संदीप काळे, वय ४४ वर्ष, व्यवसाय घरकाम, रा. दर्शन बिल्डींग मागे, आर.नं.३४१, राहुल नगर, जी.जी. एस.रोड, मुलुंद कॉलनी, मुंबई

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन लक्ष्मण कानुजी तिनगोटे हे मुळचे मौजे तुर्काबाद खराडी, ता.गंगापुर जि.औरंगाबाद येथील रहिवासी होते. अलिकडे लक्ष्मण कानुजी तिनगोटे हे मुलुंद, बृहन्मुंबई, मुंबई येथे कामकाज करीता गेले होते व तेथेच ते स्थायिक झाले होते. लक्ष्मण कानुजी तिनगोटे यांचा दि.१३/०८/२०२० रोजी राहत्या घरी ३०४, सिध्दी विनायक एस. आर. ए. हौसिंग सोसायटी लि., जव्हेर रोड, मुलुंद पश्चिम, बृहन्मुंबई, मुंबई येथे मृत्यु झाला आहे.मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे यांची पत्नी नामे रुख्मिनी लक्ष्मण तिनगोटे यांचा दि.२४/०७/२०२२ रोजी राहत्या घरी ३०४ सिध्दी विनायक एस.आर.ए. हौसिंग सोसायटी लि., जव्हेर रोड, मुलुंद पश्र्चिम, बृहन्मुंबई, मुंबई येथे मृत्यु झालाआहे. मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे यांची आई नामे अंजनाबाई कान्हुजी तिनगोटे व वडील नामे कान्हुजी तिनगोटे हे मयत आहेत. मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे आणि मयत रुख्मिनी लक्ष्मण तिनगोटे हे आपसात पती पत्नी होते. त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं.१ ते ४ यांचा जन्म झाला आहे. अर्जदारांना मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे आणि मयत रुख्मिनी लक्ष्मण तिनगोटे यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता खालील वर्णनाचे मिळकतीचे अनुषंगाने नामांतर करणे कामी व वारस कार्यवाही करणे कामी आहे. मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे हे सदरील मिळकतीचे मालक होते.मिळकतीचे वर्णन व चतुःर्सिमा ग्रामपंचायत तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथील नगर भूमापन क्रमांक ७१ क्षेत्र २६४.९० चौ.मी. ज्याची चतुः र्सिमा पुर्वेस शेरखान पठाण यांची शेती, पश्र्चिमेस : सरकारी रस्ता, दक्षिणेसः राजाराम तिनगोटे यांची जागा व उत्तरेस : पुंजाबा महादु तिनगोटे यांची जागा मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे आणि मयत रुख्मिनी लक्ष्मण तिनगोटे हे मुळचे मौजे तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवासी होते परंतु काम धंदया निमित्त मुंबई येथे वास्तव्यास गेल्याने तेथेच स्थायिक झाले व तेथेच मयत झाले. तसेच मयत लक्ष्मण कानुजी तिनगोटे यांचे नावे असलेली मिळकत मौजे तुर्काबाद खराडी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथील असुन सदर गाव हे दिवाणी न्यायालय गंगापुरचे कार्यक्षेत्रात येते. मयतांना अर्जदार नं.१ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७३/२०२६

अर्जदार:-१) चंद्रकला भाऊसाहेब सोनवणे, वय ५७ वर्ष, व्यवसाय घरकाम,२) किशोर भाऊसाहेब सोनवणे, वय ४१ वर्ष, व्यवसाय शेती,अर्जदार नं. १ व २ रा. बाभुळगाव नांगरे, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ३) अनिता विठ्ठल पानसरे, वय ३८ वर्ष, व्यवसाय घरकाम,रा.धोंदलगाव, ता. वैजापुर जि.औरंगाबाद ४) तारा कृष्णा जगताप, वय ३३ वर्ष, व्यवसाय घरकाम,रा.पारळा, ता. वैजापुर जि.औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार :निरंक

प्रकरण:- बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी.लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत भाऊसाहेब नामदेव सोनवणे यांचा दि.१६/११/२०२४ रोजी मौजे बाभुळगाव नांगरे, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन मयत भाऊसाहेब नामदेव सोनवणे यांची आई नामे साखरबाई नामदेव सोनवणे आणि वडील नामे नामदेव दौलत सोनवणे यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत भाऊसाहेब नामदेव सोनवणे आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ४ यांचा जन्म झाला आहे.मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act Vill 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.७५/२०२६

अर्जदार १) जनाबाई चंद्रभान गायके, वय ७५ वर्ष, व्यवसाय घरकाम,२) ज्ञानेश्वर चंद्रभान गायके, वय ४६ वर्ष, व्यवसाय शेती,अर्जदार नं. १ व २ रा. सुलतानाबाद, ता. गंगापुर जि.औरंगाबाद३) मुक्ता ज्ञानदेव भागवत, वय ४३ वर्ष, व्यवसाय घरकाम,रा. भालगाव, ता.नेवासा जि.अहमदनगर ४) रुक्मिणी नंदकुमार नजन, वय ३९ वर्ष, व्यवसाय घरकाम, रा. गुंफा, ता.शेवगाव, जि. अहमदनगर

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत चंद्रभान बाजीराव गायके यांचा दि.२२/०९/२०२५ रोजी मौजे सुलतानाबाद, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन मयत चंद्रभान बाजीराव गायके यांची आई नामे हौसाबाई बाजीराव गायके आणि वडील नामे बाजीराव दादा गायके यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत चंद्रभान बाजीराव गायके आणि अर्जदार नं. १ हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. २ ते ४ यांचा जन्म झाला आहे. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी इेलर Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक.** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५२/२०२६

अर्जदार :- १) राहुल दौलत चव्हाण, वय ३२ वर्ष, व्यवसाय शेती,रा. भैरवनाथबाबा मंदिर जवळ, सावंगी-लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि.औरंगाबाद २) वर्षा भ्र. अप्पासाहेब मगर, वय ३४ वर्ष, व्यवसाय घरकाम,रा. खंडाळा, ता. वैजापुर जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन मयत दौलत आसाराम चव्हाण यांचा दि.२५/११/२०२१ रोजी मौजे सावंगी-लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला असुन मयताची पत्नी नामे मयत लताबाई दौलत चव्हाण यांचा दि.०७/१०/२०२२ रोजी मौजे सावंगी-लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत दौलत आसाराम चव्हाण यांची आई नामे अनुसई आसाराम चव्हाण आणि वडील नामे आसाराम केसु चव्हाण यांचा यापुर्वीच मृत्यु झालेला आहे. मयत दौलत आसाराम चव्हाण आणि मयत लताबाई दौलत चव्हाण हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. १ व २ यांचा जन्म झाला आहे. मयतांना अर्जदार नं. १ व २हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयतांना यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०२/२०२६ रोजी दिले.

**कनिष्ठ लिपिक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि. छ. संभाजीनगर**

सिव्हील एम. ए.नं. २५ / २०२६

अर्जदार:-१) शोभाबाई प्रकाश मुंजाळ, वय ५२ वर्षे धंदा. शेती २) नवनाथ प्रकाश मुंजाळ, वय ३२ वर्षे धंदा. शेती ३) आकाश प्रकाश मुंजाळ, वय २५ वर्षे धंदा. शिक्षण सर्व रा. खडक नारळा, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

-विरूद्ध :-

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ याचे पति व २ व ३ यांची वडिल नामे श्री. प्रकाश लक्ष्मण मुंजाळ हे दि. ०२/०१/२०२३ रोजी मौजे खडक नारळा ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही.मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर सकीय कामासाठी आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत प्रकाश लक्ष्मण मुंजाळ यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

पुढील तारीख २५/०२/२०२६

**कनिष्ठ लिपिक.** आदेशावरून
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि. अर्ज क्र.९२/२०२६

अर्जदार :-१). संजय पि. तुकाराम हिवाळे, वय ४६ वर्ष, धंदा शेती रा. गाजगाव, ता.गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. घाणेगाव ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, २). कमलगाई भ्र. तुकाराम हिवाळे, वय ६९ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे ३). हिराबाई भ्र. फकीरराव शिरसे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम, रा. जामा मस्जीदजवळ, गढी, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर,

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड. एस. के. नरोडे यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क्र. १व ३ हे आपसात सख्ये भाउ बहीन असुन अर्जदार क्र. २ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ व ३ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. २ हिचे पती नामे तुकाराम रामचंद्र हिवाळे रा. गाजगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर हे दिनांक १५/०५/२०२१ रोजी मौजे ताडपिंपळगाव ता. कन्नड येथे मयत झाले आहेत. अर्जदार हे मयत तुकाराम यांचे वारस असुन त्यांच्या व्यतीरिक्त कुणीही मयतास वारस नाहीत. अर्जदार यांना शासकीय कामाकरीता ते मयत तुकाराम रामचंद्र हिवाळे यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माइया सही व शिक्याने आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी दिले.

आदेशावरून
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. एन. आर. डोके साहेब, सहदिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. ५६२/२०२५
पुढील तारीख २७/०२/२०२६

अर्जदार १) दत्तु शिवाजी निकुंभ, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद २ ) संगीता भ्र. शंकर पाटील, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडगाव पो. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) इंदुबाई भ. संतोष पाटील वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. बोरखेडे ख. ता. चाळीसगाव जि. जळगाव ४) शोभाबाई भ. सुनिल पाटील, वय ३७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. निभोरा पोटली ता. भडगाव जि. जळगाव ५) सुनिता भ्र. सचिन पाटील, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. नेरी ता. पाचोरा जि. जळगाव ६) कल्पना भ्र. भुषण आमले वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडाळी वाघई ता. चाळीसगाव जि. जळगाव ७) प्रतिभा समाधान पाटील, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. निंभोरे ता. भडगाव जि. जळगाव ८) सुंदराबाई भ. शिवाजी निकुंभ, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार

निरंक

अर्ज

Bombay Regulation Act 1827 चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बावत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील एस. एन. उपासणी यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ८ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ७ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे तसेच अर्जदार क्र. ८ ही अर्जदार क्र. १ ते ७ यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ७ यांचे वडील व अर्जदार क्र. ८ यांचे पती नामे शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम हे होते ते दिनांक २१/१०/२०२५ रोजी मौजे सायगव्हाण ता. कन्नड अल्पशा आजाराने मयत झालेले आहे. तसेच मयत शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम यांचे आई व वडील हे पुर्वीच मयत झालेले आहे. मयताचा अंत्यविधी मोजे सायगव्हाण ता. कन्नड येथे झालेला आहे. त्यांचे अर्जदार क्र. १ ते ८ हे बारस आहे, सोबत गृप ग्रामपंचायत सायगव्हाण यांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांना मयत शिवाजी दौलत निकुंभ उर्फ निकम यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय व इतर कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, करीता अर्जदार क्र. १ ते ८ हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे गृप ग्रामपंचायत कार्यालय सायगव्हाण येथे दिनांक १०/११/२०२५ रोजी बारस प्रमाणपत्राची मागणी केली असता त्यांनी वारस प्रमाणपत्र दिले नाही म्हणुन दिनांक १०/११/२०२५ रोजी अर्जास कारण घडले आहे, अर्जदार यांनी बारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ८ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ८ हे मयताचे कायदेशीर बारस आहे.त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,
दिनांक २६/०१/२०२६
**क. लिपिक**
**आदेशावरुन**
**सहाय्यक, अधिक्षक दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड**